सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २८० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. ११ डिसेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## विधान परिषदेत लोकायुक्त सुधारणा विधेयक मंजूर

### मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली घोषणा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ११ नागपुर**

हिवाळी अधिवेशनात विधान परिषदेत लोकायुक्त सुधारणा विधेयक बहुमताने मंजूर करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या निर्णयाची औपचारिक घोषणा केली असून, हा विधेयक नागरी प्रशासनात भ्रष्टाचारविरोधी उपाययोजना अधिक मजबूत करेल, असा त्यांचा विश्वास आहे.

लोकायुक्त सुधारणा विधेयकाचा मुख्य उद्देश सरकारी यंत्रणेत पारदर्शकता आणि जबाबदारी वाढवणे हा आहे. विद्यमान कायद्यातील काही मर्यादा आणि अडचणी दूर करण्यासाठी या सुधारणा करण्यात आल्या आहेत. या सुधारणा लागू झाल्यानंतर लोकायुक्ताला अधिक स्वतंत्र कार्यवाही करण्याचा अधिकार मिळेल आणि सरकारी खात्यांमधील भ्रष्टाचाराच्या प्रकरणांवर जलद कारवाई शक्य होईल.

मुख्यमंत्री फडणवीस डेव्र्हीर्ज़ींर –ाशपवाशपीं इळश्रश्र, म्हणाले, लोकायुक्त सुधारणा विधेयकामुळे सरकारी यंत्रणेत लोकशाही मूल्ये अधिक दृढ होतील. भ्रष्टाचाराविरोधी लढ्यात ही सुधारणा मोठा टप्पा ठरेल. त्यांनी विधानसभेतील सदस्यांचे सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले आणि राज्यातील नागरिकांना या सुधारणा लवकरच लाभ देतील, असे सांगितले.विधान परिषदेत विधेयक मांडल्यानंतर राष्ट्रपतींनीही याला मान्यता दिली असून काही सुधारणा सुचवल्या आहेत. या सुधारण्यात लोकायुक्त निवडीसंबंधी सुधारणा तसेच भारतीय दंड संहितेचे बदललेले नामकरण यांचा समावेश आहे. नव्या कायद्याप्रमाणे मुख्यमंत्रीदेखील लोकायुक्ताच्या कक्षेत येणार आहेत, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.राजकीय आणि प्रशासनिक विश्लेषकांच्या मते, लोकायुक्त सुधारणा विधेयकाची मंजुरी राज्यातील प्रशासनिक सुधारणा प्रक्रियेत महत्त्वपूर्ण टप्पा आहे. यामुळे विद्यमान भ्रष्टाचारविरोधी उपाययोजनांना वेग मिळेल आणि नागरिकांच्या तक्रारींवर त्वरित कार्यवाही करता येईल, तसेच अधिक पारदर्शक प्रशासनाची वातावरण निर्माण होईल. हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर या विधेयकाच्या मंजुरीला विशेष महत्त्व आहे, कारण यामुळे राज्यातील प्रशासनिक कामकाजात सुधारणा करण्यासाठी सरकारने ठोस पावले उचलली आहेत.

## अतिवृष्टी मदत योजनेत मोठे फियास्को

### ३५५ कोटींची रक्कम तांत्रिक अडथळ्यांमुळे शिल्लक; ई-केवायसीच्या गोंधळात ५.४२ लाख शेतकरी अडकले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नागपूर**

अतिवृष्टीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळावा म्हणून राज्य सरकारने जाहीर केलेले ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे मदत पॅकेज मोठ्या अपेक्षेने समोर आले होते. नैसर्गिक आपत्तीमुळे कोसळलेल्या पिकांचे नुकसान भरून काढण्यासाठी ही मदत तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यात पोहोचेल, अशी आशा होती. शासनाने निधीची तरतूद करून अनेक उपाययोजना जाहीर केल्या, परंतु प्रत्यक्षात मदतीचा प्रवास शेतकऱ्यांपर्यंत पोहोचताना मोठ्या प्रमाणात तांत्रिक अडथळे आडवे आल्याचे स्पष्ट झाले आहे.



ई-केवायसी पूर्ण नसणे, आधार आणि बँक नोंदीतील विसंगती, तसेच पोर्टलशी संबंधित त्रुटींमुळे अनेकांचे अर्ज अपूर्ण स्थितीत राहिले आहेत. यामुळे सुमारे ५ लाख ४२ हजार १४१ शेतकऱ्यांच्या नावावरची ३५५ कोटी ५५ लाख रुपयांची मदत अद्याप शासनाकडेच अडकून आहे. मुख्य सचिवांकडून घेतलेल्या आढाव्यात ही गंभीर बाब समोर आली असून, प्रशासनाची गतीमानता आणि यंत्रणांची कार्यक्षमता याबद्दल मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

मराठवाडा हा अतिवृष्टीचा सर्वाधिक फटका बसलेला क्षेत्र असल्याने निधी अडकल्याचा सर्वात मोठा भारही या भागातील शेतकऱ्यांवरच पडला आहे. छत्रपती संभाजीनगर विभागात एकूण १६५ कोटी ७२ लाख रुपयांची रक्कम प्रलंबित राहिल्याचे स्पष्ट झाले आहे. बीड जिल्ह्यातच २९ हजार ५०४ शेतकऱ्यांचे १५ कोटी ७२ लाख रुपये अडकले आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ४५ हजार ४८२ शेतकऱ्यांना २८ कोटी ५१ लाख रुपयांची रक्कम मिळालेली नाही, तर धाराशिव जिल्ह्यात २४ हजार ९१४ शेतकऱ्यांसाठी राखीव ठेवलेले १७ कोटी ७७ लाख रुपये अद्याप वितरणाच्या प्रतीक्षेत आहेत. याशिवाय, हिंगोलीतील १३ हजार १५१ शेतकऱ्यांचे ८ कोटी २६ लाख, जालना जिल्ह्यातील ३८ हजार ९९० शेतकऱ्यांचे २ कोटी ३३ लाख, नांदेडमधील तब्बल ५५ हजार ८११ शेतकऱ्यांचे ३१ कोटी ५६ लाख आणि परभणी जिल्ह्यातील ४५ हजार ७७५ शेतकऱ्यांचे २२ कोटी ५७ लाख रुपये शासनाच्या खात्यातच शिल्लक आहेत. या साऱ्यामुळे मराठवाड्यातील हजारो शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अधिकच बिकट बनली आहे.

राज्याच्या इतर विभागांतही मदत वितरणाचा वेग अत्यंत मंद असून मोठ्या प्रमाणात निधी शासन तिजोरीत न वापरता पडून असल्याचे लक्षात आले आहे. नाशिक विभागात ५० कोटी २१ लाखांची रक्कम अद्याप अडकली आहे, तर अमरावती विभागात सर्वाधिक ८३ कोटी ९ लाखांचा निधी अडथळ्यामुळे पुढे सरकलेला नाही. नागपूरमध्ये ३३ कोटी १ लाख, पुणे विभागात २० कोटी २९ लाख आणि कोकणात ३ कोटी २७ लाख रुपये शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये जमा न होता शासनाकडेच ठेवलेले आहेत. या सर्व प्रकरणांमध्ये एकाच मुद्द्याचा प्रभाव स्पष्टपणे दिसत आहे. ई-केवायसीची अपूर्णता हा मोठा अडथळा ठरला आहे. बँक आणि आधार जोडणीतील चुका, नावांमध्ये झालेल्या स्पेलिंगच्या विसंगती, तसेच पोर्टलवरील डेटा अपलोडिंगमधील त्रुटी यांनी निधी वितरण प्रक्रियेवर मोठा परिणाम केला आहे.

**प्रक्रियेचा वेग वाढवावा, अशी मागणी**

योजनेनुसार तातडीने मदत मिळेल, या अपेक्षेने अनेक शेतकरी दिवसेंदिवस बँका, इंटरनेट सेंटर आणि सरकारी कार्यालयांचे चकरा मारत आहेत. मात्र, प्रक्रियेतील तांत्रिक गुंतागुंत लक्षात घेता त्यांना अद्यापही मदतीसाठी थांबावे लागत आहे. हवामान बदलामुळे वारंवार येणाऱ्या अतिवृष्टीने आधीच शेतकऱ्यांचे अर्थकारण कोलमडले आहे आणि त्यात मदतकपातीचे हे नवीन संकट उभे राहिल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरत आहे. प्रशासनाच्या त्रुटींमुळे हक्काची मदत रोखली जाणे अन्यायकारक असल्याचे ग्रामीण भागात ठामपणे व्यक्त केले जात आहे. अनेक शेतकऱ्यांनी याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींना तक्रारी दिल्या असून प्रक्रियेचा वेग वाढवावा, अशी मागणी सतत होत आहे.

## महायुतीची महानगरपालिका रणनिती तयार

### मुंबई-ठाण्यासह ५ शहरांत भाजप-शिंदे सेना एकत्र, पुण्यात एनसीपीची स्वतंत्र वाटचाल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ मुंबई**

राज्यातील आगामी महानगरपालिका निवडणुका जवळ आल्याने महायुतीने मोठा रणनीती बदल करत पुढील लढाईची आखणी जवळपास अंतिम केल्याची माहिती समोर येत आहे. सर्वपक्षीय चर्चांच्या फेऱ्या, अंतर्गत समन्वय आणि स्थानिक शक्तिसमीकरणांचा आढावा घेत अखेर महायुतीने कोणत्या शहरात कोणत्या पद्धतीने निवडणूक लढवायची याचा व्यापक फॉर्म्युला निश्चित केल्याचे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले आहे. या नव्या नियोजनात काही शहरांत भाजप आणि शिवसेना शिंदे गट संयुक्त मोर्चा उभारणार असताना, काही महापालिकांत भाजप व राष्ट्रवादीची वेगळी वाटचाल दिसणार आहे.

पहिल्या टप्प्यात मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नाशिक आणि नागपूर या पाच महत्त्वाच्या महानगरपालिकांमध्ये भाजप आणि शिंदे गट एकत्रितपणे मैदानात उतरणार आहेत. मुंबई आणि ठाण्यात भाजपकडे मजबूत संघटन असून, शिंदे गटाकडे स्थानिक नेतृत्वाचा भरवसा असल्याने या शहरांत एकत्रित रणनिती प्रभावी ठरेल, असा विश्वास दोन्ही पक्षांत आहे. नागपूरात भाजपची पकड अधिक घट्ट असली तरी मित्रपक्ष म्हणून शिवसेनेला पुरेसा सन्मान मिळेल, याची काळजी घेण्यात येत आहे. कल्याण-डोंबिवली आणि नाशिक या दोन्ही शहरांतही संयुक्त उमेदवारी आणि समन्वयातून महायुतीने सत्तेची पुनरावृत्ती साधण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. नवी मुंबईसंबंधी निर्णय अद्याप प्रलंबित असला तरी, भाजप-शिंदे सेना एकत्र लढण्याची शक्यता अधिक असल्याची चर्चा सुरू आहे.

याउलट पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांसाठी पूर्णपणे वेगळी दिशा स्वीकारण्यात आली आहे. येथे भाजप आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) हे दोन्ही पक्ष स्वतंत्रपणे निवडणुकीत उतरण्याची योजना करत आहेत. या दोन्ही महापालिकांत भाजप आणि राष्ट्रवादीचे कार्यकर्ते जवळपास समसमान संख्येने आणि शक्तीने सक्रिय आहेत. त्यामुळे जागावाटप करताना निर्माण होणारा तणाव आणि बंडखोरी टाळण्यासाठी दोन्ही पक्षांनी स्वतंत्र लढत देणेच योग्य ठरेल, असा अंतर्गत निष्कर्ष काढण्यात आला आहे. विरोधकांना विभागून त्यांच्यावर वर्चस्व मिळवण्याची रणनीतीही या निर्णयामागे असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. लोकसभेच्या पार्श्वभूमीवर दोन्ही शहरांमध्ये स्वतःची ताकद स्वतंत्रपणे आजमावून पाहण्याच्या उद्देशाने हा निर्णय महत्त्वाचा ठरतो.

## 'कोण होतास तू, काय झालास तू? मुख्यमंत्र्यांनी पांघरुण खातं सुरु करावं' - उद्धव ठाकरे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ११ नागपुर**

मद्रास उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जी. आर. स्वामीनाथन यांना पदावरून हटविण्यासाठी तमिळनाडूतील सत्ताधारी द्रमुक पक्षाने महाभियोग आणण्याची तयारी केली आहे. यावर शिवसेनेनेही (ठाकरे) सहमती दर्शवली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शिवसेनेच्या (ठाकरे) या भूमिकेवर लोकसभेत टीका करताना उद्धव ठाकरेंना काय झालंय कळेना? असे म्हटले होते. अमित शाहांच्या भाषणातील हा उल्लेख एक्सवर शेअर करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'कोण होतास तू, काय झालास तू?', असे कॅप्शन लिहित ठाकरेंना टोला लगावला होता. यावर आता उद्धव ठाकरेंनी पलटवार केला आहे.




आज हिवाळी अधिवेशनासाठी उद्धव ठाकरे नागपूरच्या विधीमंडळात आले होते. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. उद्धव ठाकरेंनी पत्रकार परिषदेत म्हटले की, महायुतीचे सरकार केवळ निवडणुका लढविण्याच्यादृष्टीने काम करत आहे. रोज कोणत्या ना कोणत्या मंत्र्यांचा भ्रष्टाचार उघडकीस येत आहे. त्यांचे व्हिडीओ, फोटो बाहेर येत आहेत. तरीही मुख्यमंत्री ढिम्म आहेत.

मुख्यमंत्र्यांनी आता नवीन खाते बनवावे आणि त्याचे नाव पांघरून खाते ठेवावे. म्हणजे बाकीचे मंत्री पांघरून पाहून हात-पाय पसरतील. मला मुख्यमंत्र्यांची दया येते, असे सांगून उद्धव ठाकरेंनी त्यांच्यासाठी एक चारोळी सादर केली. ते म्हणाले, कोण होतास तू, काय झालास तू, एवढ्या सगळ्या भ्रष्टाचाऱ्यांना पांघरुणाखाली घेतलेस तू, कोण होतास तू, काय झालास तू.

## अतिवृष्टीवर चर्चा; मात्र मंत्री गायब! जाधवांचा तुफान हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक दि. ११ नागपुर**

राज्यातील अतिवृष्टीमुळे कोट्यवधींचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर विधानभवनात आज चर्चा आयोजित करण्यात आली होती. मात्र या गंभीर चर्चेला दुग्ध, कृषी आणि महसूल या महत्त्वाच्या विभागांचे मंत्रीच गैरहजर राहिल्याने सत्ताधारी व विरोधक दोघांच्याही नाराजीत भर पडली. शिवसेना (ठाकरे गट) चे नेते भास्कर जाधव यांनी या अनुपस्थितीवर जोरदार टीका करत सरकारवर तीव्र हल्लाबोल केला. सलग दुसऱ्या दिवशी त्यांनी नाराजी व्यक्त करत मंत्र्यांच्या निष्काळजीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. आश्चर्य म्हणजे, भाजपच्या काही आमदारांनीही मंत्र्यांच्या अनुपस्थितीबाबत नाराजी नोंदवली.



अतिवृष्टीमुळे उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या मदतीबाबत बोलताना जाधव यांनी केंद्र आणि राज्य सरकार दोघांवरही तीव्र प्रहार केला. एनडीआरएफचे निकष वाढवले गेले आहेत का? कापूस, संत्री, कांदा यांसारखी पिके पूर्णपणे नष्ट झाली असताना सरकार कोणती ठोस मदत देणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. त्याचबरोबर कोकणातील मोठ्या प्रमाणातील नुकसानीकडेही त्यांनी लक्ष वेधले. केंद्रीय पथकाच्या पाहणीवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. पथक दिवसा आलं का? त्यांची पाहणी कितपत गंभीर होती? असा खोचक सवाल करत त्यांनी केंद्राच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली.

पुरवणी मागण्यांतील मोठ्या रकमेचा उल्लेख करत जाधव म्हणाले की, ७५ हजार कोटींच्या पुरवणी मागण्यांमधून राज्याची आर्थिक अवस्था ढासळल्याचं स्पष्ट दिसत आहे. शेतकऱ्यांना दिलेल्या मदतपॅकेजबाबतही त्यांनी सरकारला धारेवर धरले.


तीन-चार हेडखाली दिलेली मदत म्हणजे पॅकेज नव्हे. हे फसवे पॅकेज आहे. शेतकऱ्यांना दिशाभूल करण्याचा प्रयत्न आहे, अशी टीका त्यांनी केली. सरकार ३२ हजार कोटींच्या पॅकेजचा दावा करत असलं तरी सभागृहात त्याची स्पष्टता दिली जात नसल्याचेही त्यांनी नमूद केले. अतिवृष्टीमुळे नद्यांनी जमीन वाहून नेली, अनेक ठिकाणी शेतजमीनच नाहीशी झाली. अशा परिस्थितीत एका हंगामापुरती मदत अपुरी ठरणार असून दीर्घकालीन योजना आवश्यक असल्याचे जाधव यांनी सांगितले. चर्चा केवळ भाषणापुरती न ठेवता ठोस उपाययोजना करणे हीच वेळेची गरज असल्याचं ते म्हणाले.

## मुख्यमंत्री सहायता निधीत ऑक्टोबरमध्ये १ अब्ज जमा

### शेतकऱ्यांना फक्त ७५ हजारांची मदत, आरटीआयमधून धक्कादायक माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११मुंबई**

राज्यात सप्टेंबर महिन्यात झालेल्या विक्राळ अतिवृष्टीनंतर मोठ्या प्रमाणावर पीकनुकसान झाले. आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी नागरिकांनी, उद्योगांनी आणि विविध संस्थांनी पुढाकार घेत मुख्यमंत्री सहायता निधीत उदंड योगदान दिले. ऑक्टोबर २०२५ या एका महिन्यातच या निधीत एक अब्ज रुपयांहून अधिक देणगी जमा झाल्याची खात्री पटली आहे. मात्र, त्याच कालावधीत प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या खात्यावर पोहोचलेली मदत केवळ ७५ हजार रुपये असल्याचे आरटीआय कार्यकर्ते वैभव कोकाट यांच्या मागणीतून उघड झाले आहे.



या आकडेवारीने शेतकऱ्यांच्या मदतीसाठी असलेल्या सरकारी वचनबद्धतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले असून, सहायता निधीचा उपयोग नेमका कोणत्या उद्देशासाठी केला गेला, हा मुद्दा आता चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. विशेषतः अतिवृष्टीच्या काळात महाराष्ट्रातील ग्रामीण भागात झालेल्या प्रचंड नुकसानीचा संदर्भ लक्षात घेतला तर, जमा झालेल्या रकमेच्या तुलनेत प्रत्यक्ष दिली गेलेली मदत अत्यंत नगण्य असल्याचे स्पष्ट दिसते.

आरटीआय कार्यकर्ते वैभव कोकाट यांनी मुख्यमंत्री सहायता निधीतील ऑक्टोबर महिन्यातील जमा रक्कम आणि पूरग्रस्त शेतकऱ्यांना मिळालेल्या मदतीचा तपशील मागवला होता. त्यावर मिळालेल्या उत्तरातून ही संपूर्ण माहिती बाहेर आली. यापूर्वी राज्य सरकारने साखर कारखान्यांना एक टन उसामागे १० रुपये, मुख्यमंत्री सहायता निधीसाठी जमा करण्याचे निर्देश दिले होते. या निर्णयावर शेतकरी संघटनांसह विरोधकांनी मोठा आक्षेप घेतला होता. या वादानंतरही निधीत मोठ्या प्रमाणावर देणगी जमा झाली; मात्र या प्रचंड रकमेतील पैसे प्रत्यक्ष मदत म्हणून शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेच नाहीत. पूरस्थितीनंतर महाराष्ट्रभरातून लोकांनी मदतीसाठी हात पुढे केले, सोशल मीडियासह विविध माध्यमांतून निधी गोळा करण्यात आला, पण त्यातील बहुतांश रक्कम शेतकऱ्यांच्या संकटनिवारणासाठी वापरली गेली नसल्याने व्यापक असंतोषाची स्थिती निर्माण झाली आहे.

पूरपरिस्थितीमुळे महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांतील शेतकरी गंभीर अडचणीत आहेत. पीकहानी, जमिनीची धूप, जनावरांचे नुकसान, तसेच कर्जाचा वाढता बोजा यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री सहायता निधीतील प्रचंड रक्कम निष्क्रिय राहणे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. कृषी तज्ज्ञांच्या मते, अशा मोठ्या रकमेतून तातडीने आर्थिक मदत मिळाली असती तर शेतकऱ्यांचा ताण मोठ्या प्रमाणावर कमी झाला असता. मात्र मदतीच्या प्रक्रियेतल्या ढिलाईमुळे शेतकऱ्यांच्या असंतोषात वाढ झाली असून, मदत नेमकी कुठे आणि कशी वापरली जाते याबाबत पारदर्शकतेची मागणी आता ठामपणे केली जात आहे. पुढील काही दिवसांत या प्रकरणात सरकारची प्रतिक्रिया काय असते, तसेच मदतीच्या वाटपाबाबत नवीन निर्णय घेतला जातो का, याकडे राज्याची उत्सुकता लागली आहे.

## चुकीची आकडेवारी देऊन निव्वळ गैरसमज निर्माण होतात - मुख्यमंत्री

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ११ नागपुर**

राज्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहायता निधीत मोठ्या प्रमाणावर रक्कम जमा झाली असताना, प्रत्यक्षात अत्यल्प मदत वितरित झाल्याचा दावा समोर आल्यानंतर आज विधिमंडळात मोठा गदारोळ झाला. माजी विधानपरिषद सभापती अंबादास दानवे यांनी आरटीआयमधील आकडेवारीच्या आधारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर टीका करत १०० कोटी जमा असताना फक्त ७५ हजार रुपये शेतकऱ्यांना वाटले गेल्याचा आरोप केला होता. त्यांच्या या ट्विटने राजकीय वातावरण ढवळून निघाले. दानवे म्हणाले होते की, अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांवर ओढवलेल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर लोकांनी मुख्यमंत्री सहायता निधीत अब्जावधी रुपये दिले, पण खर्च मात्र फक्त ७५ हजार रुपयेच झाले. हा निधी अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांसाठी असून, सरकार हा निधी त्यांच्या 'उद्योजक मित्रांचा इलेक्शन फंड' समजत आहे का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला होता.

या आरोपांवर आता मुख्यमंत्री कार्यालयाने प्रतिक्रिया देत दानवे यांनी मांडलेली माहिती चुकीची आणि दिशाभूल करणारी असल्याचे स्पष्ट केले आहे. सीएमओने सांगितले की, ज्या आकडेवारीचा आधार घेत आरोप करण्यात आले, ती फक्त ऑक्टोबर महिन्याची असून तीही अचूक नाही. एका महिन्याचे अपूर्ण तपशील देऊन सर्वसमावेशक निष्कर्ष काढणे हा निव्वळ गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न असल्याचे सीएमओने म्हटले आहे. चुकीची माहिती कशी दिली गेली, याची चौकशीही सुरू करण्यात आली असून दोषींवर कारवाई केली जाईल, असेही स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

## संपादकीय ......

# सक्षम स्त्री, सक्षम भारत

*महिलांविरोधातील हिंसाचार हा केवळ महप्रश्न नाही, तर ती राष्ट्रीय चिंतेची बाब आहे. प्रत्येक ओएससीद्वारे प्रत्येक हेल्पलाईनला उत्तर दिले गेले आणि प्रत्येक प्रकरण सोडवले गेले.*

*महिला पुढे जातात, तेव्हा देश भरारी घेतो. समानता आणि न्याय ही मूल्ये खोलवर रुजलेल्या समाजात स्त्रीच्या प्रतिष्ठेशी तडजोड शक्य नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली भारत सरकारने महिलांची सुरक्षा, संरक्षण आणि सक्षमीकरणासाठीचा व्यापक कार्यक्रम असलेल्या 'मिशन शक्ती'च्या माध्यमातून संस्थात्मक चौकटीत रूपांतरित करून हा विश्वास पुन्हा दृढ केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अगदी बरोबर म्हटले आहे की, आमचे सरकार महिलांचा सन्मान आणि सुविधा याला सर्वाधिक महत्त्व देते. हे मार्गदर्शक शब्द म्हणजे केवळ भावना नाहीत, तर तो पाया आहे, ज्यावर मोदी सरकारने मिशन शक्तीअंतर्गत भारताच्या कानाकोपर्यांत महिला सक्षमीकरणासाठी मजबूत संस्थात्मक यंत्रणा उभारली आहे. या प्रयत्नांच्या केंद्रस्थानी मिशन शक्तीच्या संबल उपयोजनेंतर्गत कार्यरत असलेली वन स्टॉप सेंटर (ओएससी) आहेत. २०१५ मध्ये सुरू केलेली ही केंद्रे हिंसाचाराला बळी पडलेल्या महिलांना एकात्मिक प्रतिसाद यंत्रणा प्रदान करतात, जेणेकरून त्यांना गप्प राहून त्रास सहन करावा लागत नाही अथवा खंडित आधार व्यवस्थांमधून मार्ग शोधावा लागत नाही.*

*आतापर्यंत भारतभरात ८६२ ओएससी कार्यरत आहेत. इथे एकाच छताखाली १२.२० लाखांहून अधिक महिलांना कायदेशीर मदत, वैद्यकीय सहाय्य, पोलिस सुविधा, निवारा आणि मानसिक समुपदेशन यासारखा एकात्मिक आधार प्राप्त झाला आहे. भयापासून स्वातंत्र्यापर्यंत, शांततेपासून आधारापर्यंत ओएससी आहेत. तिथे उपचार सुरू होतात. ही केंद्रे प्रतिक्रियाशील प्रशासनाकडून सक्रिय प्रशासनाकडे होणारे परिवर्तन दर्शवतात. एखाद्या महिलेला घरात, कामाच्या ठिकाणी किंवा सार्वजनिक ठिकाणी हिंसाचाराचा सामना करावा लागत असला, तरी ओएससी त्या महिलेचे पुनर्वसन, सन्मान आणि न्याय मिळवून देण्याच्या मोदी सरकारच्या संकल्पाचे प्रतीक म्हणून कार्यरत आहेत. महत्त्वाचे म्हणजे, ही केंद्रे रुग्णालयांच्या आत अथवा त्याच्या जवळ आहेत, जेणेकरून वैद्यकीय सेवा त्वरित उपलब्ध होईल. संकटामध्ये दिलेल्या प्रतिसादाचे हे पहिले महत्त्वाचे पाऊल आहे. महिला हेल्पलाईनचे सार्वत्रिकीकरणदेखील (१८१) तेवढेच महत्त्वाचे आहे, जे संकटात सापडलेल्या महिलांसाठी (२४७) सहाय्य सुनिश्चित करून ओएससीला पूरक ठरते. ३५ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये कार्यरत असलेल्या या हेल्पलाईनने २.५६ कोटी कॉल हाताळले आहेत आणि १३.४८ लाखांहून अधिक महिलांना (३० सप्टेंबरपर्यंत) मदत केली आहे. आपत्कालीन प्रतिसाद समर्थन प्रणालीबरोबर (११२) जोडलेली ही हेल्पलाईन संकट आणि मदत यांच्यातील अंतर कमी करते.*

*पद्धतशीर उत्तरदायित्व आणि जलद न्यायदानाला बळकटी देण्यासाठी आम्ही ७४५ फास्ट-ट्रॅक विशेष न्यायालये स्थापन केली असून, यात ४०४ विशेष पोक्सो न्यायालयांचा समावेश आहे. या न्यायालयांनी आतापर्यंत ३.०६ लाखांहून अधिक प्रकरणे निकाली काढली. यासंदर्भात दिलेला प्रत्येक निर्णय, बहाल केलेला प्रत्येक अधिकार समन्यायी आणि लिंगभेदमुक्त भारताच्या दिशेने टाकलेले एक पाऊल आहे. प्रक्रियात्मक विलंबांमुळे आता न्यायदानात अडथळा निर्माण होत नाही आणि प्रत्येक पीडित व्यक्ती कालबद्ध न्यायाची अपेक्षा करू शकते.*

*त्याचबरोबर आम्ही पोलिस ठाण्यांमध्ये १४ हजार ६५८ हेल्प डेस्क (डब्ल्यूएचडी) स्थापन केले असून, तळागाळातील महिलांना आधार देत आहोत. यापैकी ३ हजार ७०० हून अधिक पोलीस ठाणी महिलांच्या नेतृत्वाखाली कार्यरत आहेत. हे डेस्क गुन्ह्यांची तक्रार करण्यासाठी पीडितांमध्ये आत्मविश्वास वाढवतात. लिंगभेदावरील प्रकरणे संवेदनशीलपणे हाताळणार्या प्रशिक्षित कर्मचार्यांचे त्यांना सहाय्य मिळते. मानवी तस्करीचा सामना करण्यासाठी ८०७ मानवी तस्करी विरोधी युनिटस्देखील कार्यरत केली आणि निर्भया निधी अंतर्गत रेल्वे आणि रस्ते वाहतूक सेवांमध्ये आपत्कालीन पाळत ठेवणारी यंत्रणा बसवून सुरक्षित वाहतूक सुनिश्चित केली आहे.*

*'बेटी बचाओ, बेटी पढाओ'सारख्या उपक्रमांद्वारे आम्ही मानसिकता बदलत आहोत आणि आदर, समानता आणि संधी ही मूल्ये रुजवत आहोत. प्रधानमंत्री मातृ वंदना योजना आणि सखी निवास या योजनांच्या माध्यमातून आम्ही अशा प्रणाली विकसित करत आहोत, ज्या महिलांना केवळ यातून वाचलेल्या महिला म्हणून नव्हे, तर देशाच्या प्रगतीमधील भागीदार म्हणून महत्त्व देतात. आमची सखी निवास वसतिगृहे २६ हजारांहून अधिक नोकरदार महिलांना सुरक्षित आणि परवडणारी घरे उपलब्ध करून देत आहेत. त्यापैकी बहुतेक वसतिगृहे शहरी आणि निमशहरी भागात आहेत. त्यामुळे या महिलांना निर्भयपणे त्यांची स्वप्ने पूर्ण करण्याची संधी मिळते.*

*मिशन शक्तीअंतर्गत आमची रणनीती अभिसरण, समन्वय आणि समुदायाच्या मालकीवर आधारित आहे. संकल्प : महिला सक्षमीकरण केंद्र सुरू करून आम्ही स्थानिक पातळीवरील अंमलबजावणीमध्ये एक धोरणात्मक स्तर जोडला आहे, ज्यामुळे महिलांना एकाच व्यासपीठावरून अनेक योजनांचा लाभ घेता येईल. २७ लाखांहून अधिक महिलांनी या केंद्रांचा लाभ यापूर्वीच घेतला असून, ती सक्षमीकरण आणि अभिसरणाचे स्थानिक केंद्र म्हणून काम करत आहेत. महिलांविरोधातील हिंसाचार हा केवळ महिलांचा प्रश्न नाही, तर ती राष्ट्रीय चिंतेची बाब आहे. स्थापन करण्यात आलेल्या प्रत्येक ओएससीद्वारे प्रत्येक हेल्पलाईनला उत्तर दिले गेले आणि प्रत्येक प्रकरण सोडवले गेले. यामधून प्रत्येक महिला सन्मानाने, सुरक्षिततेने आणि अभिमानाने जगू शकेल असा भारत निर्माण करण्यासाठी महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्या सामूहिक वचनबद्धतेचे प्रतिबिंब दिसून येते.*

*आपण अमृत काळात प्रवेश करत आहोत. हा भारताच्या विकास आणि परिवर्तनाचा सुवर्ण काळ असेल. महिला सक्षमीकरण हे केवळ एक ध्येय नाही, तर ते एक राष्ट्रीय मिशन आहे. २०४७ पर्यंत विकसित भारताची निर्मिती करण्याचे स्वप्न त्याच्या केंद्रस्थानी असलेल्या सक्षम महिलांशिवाय पूर्ण होणे अशक्य आहे. नारी शक्ती ही केवळ एक घोषणा नाही, तर ती आपली रणनीती आहे. ती आपली ताकद आहे. ते आपले भविष्य आहे. महिला या विकसित भारताचा कणा आहेत. त्यांना सन्मान, सुरक्षितता आणि समान संधी देण्यामध्ये कोणतीही तडजोड होऊ शकत नाही. सक्षम महिला, सुरक्षित जागा आणि प्रत्येक पावलाबरोबर आपण एक मजबूत, सुरक्षित आणि अधिक समावेशक भारत निर्माण करत आहोत.*

# जमिनीच्या अकृषिक वापरानंतर आता 'सनद'ची अटही रद्द!

## महसूलमंत्र्यांचा ऐतिहासिक निर्णय, कोट्यवधी नागरिकांना दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११नागपूर –** राज्यातील जमीन महसूल प्रक्रियेत सुलभता आणण्यासाठी राज्य सरकारने आणखी एक महत्वपूर्ण आणि ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. अकृषिक परवानगीची अट रद्द केल्यानंतर आता त्यापुढील 'सनद' घेण्याची क्लिष्ट अटही रद्द करण्यात आली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या संदर्भातील 'महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक २०२५' विधानसभेत मांडले, ज्याचे सत्ताधारी आणि विरोधकांकडून स्वागत करण्यात आले आहे. या निर्णयामुळे राज्यातील कोट्यवधी नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.



**नेमका बदल काय आणि त्याचा फायदा कसा होणार?**

विधानसभेत या विधेयकाची पार्श्वभूमी मांडताना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले की, १९६६ च्या जमीन महसूल संहितेमध्ये २०१४ ते २०१८ दरम्यान सुधारणा करून रहिवासी आणि वाणिज्यिक वापरासाठी 'एन.ए.' (अकृषिक) परवानगीची अट यापूर्वीच शिथिल करण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही नागरिकांना 'सनद' घ्यावी लागत असल्याने प्रक्रिया किचकटच राहिली होती. आता ही अट पूर्णपणे काढून टाकण्यात आली असून, त्याऐवजी नाममात्र प्रीमियम (अधिमूल्य) आकारला जाणार आहे. यामुळे जमीन महसूल प्रक्रिया अधिक सोपी आणि पारदर्शक होणार आहे.

असे असतील नवीन प्रीमियमचे दर (रेडी रेकनरनुसार)

जमिनीच्या वापरासाठी आता सनदची गरज नसून, खालीलप्रमाणे रेडी रेकनरच्या (बाजारमूल्य) आधारावर प्रीमियम भरून वापर नियमित करता येईल:

१००० चौरस मीटरपर्यंत: रेडी रेकनरच्या ०.१ टक्का.१००१ ते ४००० चौरस मीटरपर्यंत: रेडी रेकनरच्या ०.२५ टक्के.


४००१ चौरस मीटर व त्यापुढील भूखंडांसाठी: रेडी रेकनरच्या ०.५ टक्के.

या बदलामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना मिळणाऱ्या करात किंवा शुल्कात कोणतीही कपात होणार नसून, त्यांना त्यांचा वाटा मिळणार असल्याचेही सरकारने स्पष्ट केले आहे.

विरोधकांकडून स्वागत, पण शेतजमिनी वाचवण्याचे आव्हान

या विधेयकावर चर्चा करताना विरोधकांनी या निर्णयाचे स्वागत केले. अकृषिक कराची अट रद्द करून सनदची प्रक्रिया सोपी केल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले. आमदार विक्रम काळे, प्रवीण दटके, योगेश सागर, रमेश बोरनारे, जयंत पाटील यांनी विधेयकाचे स्वागत तर महसूलमंत्री बावनकुळे यांचे अभिनंदन केले. काँग्रेसचे आमदार नाना पटोले यांनी यावेळी शेतजमिनी वाचवण्याचा मुद्दा उपस्थित केला. शहरीकरणामुळे कृषक जमीन कमी होत चालली आहे आणि दुसरीकडे पुरामुळे नदीकाठची जमीन खरडून जात आहे. त्यामुळे कृषक जमीन टिकवणे हे मोठे आव्हान असल्याचे मत त्यांनी मांडले.

# हिवाळ्यात का वाढतात कॅन्सरच्या वेदना?



**दि.११विदर्भ प्रजासत्ताक** हिवाळ्यातील थंड तापमान, स्नायूंचा कडकपणा, वातावरणातील सूर्यप्रकाशाची कमतरता आणि थंडीत रक्तप्रवाह मंदावल्यामुळे कर्करोगाच्या वेदना अधिक तीव्र होतात. तापमान घसरल्यावर शरीरातील रक्तप्रवाह, स्नायूंची लवचिकता आणि नसांमधील संवेदनशीलतेत बदल होतात, ज्याचा थेट परिणाम या वेदनांवर होतो.




हिवाळ्यात कर्करोगाच्या वेदना तीव्र किंवा अधिक स्थिर होतात. केमोथेरपी किंवा रेडिएशन घेत असलेल्या लोकांमध्ये अनेकदा नसा संवेदनशील होतात, म्हणून तापमानात घट झाल्यास त्यांना अस्वस्थता किंवा वेदना जाणवू शकतात.

थंड हवामानामुळे रक्तवाहिन्या आकुंचन पावतात. यामुळे स्नायू आणि ऊतींना रक्तपुरवठा कमी होतो, ज्यामुळे वेदना होतात. थंड तापमानामुळे स्नायू कडक होतात आणि वेदना वाढतात आणि कधीकधी गतिहीनता देखील वाढू शकते. हिवाळ्यात केमोथेरपीमुळे न्यूरोपॅथीची समस्या जाणवते. न्यूरोपॅथी म्हणजे मज्जातंतूंच्या नुकसानीमुळे शरीराच्या एका किंवा अधिक भागांमध्ये होणारी वेदना, सुन्नपणा (बधीरपणा), मुंग्या येणे किंवा अशक्तपणा ही एक स्थिती आहे, जी अनेक कारणांमुळे होऊ शकते आणि पायांमध्ये जास्त आढळते.

काही कर्करोगाच्या रुग्णांना पायांमध्ये जळजळ, मुंग्या येणे आणि बधीरपणा जाणवू शकतो, त्यांना वेळीच लक्ष देण्याची गरज भासते. फ्लू किंवा सर्दी सारख्या हिवाळ्यातील संसर्गामुळे शरीरावर ताण येतो, जळजळ वाढते आणि कर्करोगाच्या वेदना आणखी तीव्र होतात. कर्करोगाच्या रुग्णांनी त्यांच्या आरोग्याची जबाबदारी घेत उपचार करणार्या तज्ज्ञांनी दिलेल्या सूचनांचे पालन करावे. सांधे कडक होणे आणि सांध्यामधील वेदना टाळण्यासाठी कर्करोगाच्या रुग्णांनी त्यांचे शरीर उबदार ठेवणे आणि संपूर्ण शरीर झाकणारे कपडे घालणे गरजेचे आहे. स्नायूंचा कडकपणा दूर करण्यासाठी उबदार कॉम्प्रेस किंवा हीटिंग पॅडचा पर्याय निवडावा. घरच्या घरी स्ट्रेचिंग करावे किंवा चालण्याचा व्यायाम करावा जे रक्ताभिसरण सुधारण्यास फायदेशीर ठरेल. थकवा आणि वेदना कमी करण्यासाठी पुरेशी झोप घ्यावी. तीव्र सांधेदुखी आणि स्नायूंचा कडकपणा दूर करण्यासाठी स्वतःची विशेष काळजी घ्यावी.

# किमान तापमानात घट; पिकांसाठी काय कराल? जाणून घ्या कृषी सल्ला सविस्तर

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक** पुढील काही दिवस हवामान कोरडे राहणार असल्याने पिकांमध्ये पाणी व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे आहे. कापूस, तूर, रब्बी ज्वारी, गहू तसेच फळबाग आणि भाजीपाल्यावरील थंडीचा परिणाम लक्षात घेऊन तज्ज्ञांनी शेतकऱ्यांसाठी आवश्यक त्या उपाययोजना सुचवल्या आहेत. प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबईने दिलेल्या माहितीनुसार, मराठवाडा विभागात आगामी चार ते पाच दिवस हवामान पूर्णपणे स्वच्छ व कोरडे राहणार आहे. पुढील तीन दिवसांत किमान तापमानात किंचित घट जाणवेल; मात्र त्यानंतर तापमानात फारसा बदल होणार नाही. दिवसाचा उन्हाळा सौम्य तर रात्रीची थंडी काही प्रमाणात जाणवेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांच्या ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ज्ञ समितीने शेतकऱ्यांसाठी सविस्तर कृषी सल्ला जारी केला आहे.




**तज्ज्ञ समितीचा महत्त्वाचा संदेश–** पुढील पाच दिवस हवामान कोरडे राहणार असल्याने सर्व पिकांमध्ये पाणी व्यवस्थापन काळजीपूर्वक करावे. फळबाग, भाजीपाला व फुलबागांमध्ये पाण्याचा ताण पडणार नाही याची दक्षता घ्यावी.

**पीक व्यवस्थापनासाठी महत्त्वाचे मार्गदर्शन–** कापूस वेचणीस आलेल्या कापसाची तातडीने वेचणी करून घ्यावी. साठवणुकीपूर्वी कापूस नीट वाळवावा, अन्यथा प्रत कमी होऊ शकते.




**तूर–** शेंगा पोखरणाऱ्या अळीवर प्रभावी नियंत्रणासाठी ५% निंबोळी अर्क, किंवा क्विनॉलफॉस २५% – २० मिली, किंवा इमामेक्टीन बेन्झोएट ५% – ४.५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फुलोरा व शेंगा धरण्याच्या अवस्थेत पाण्याचा ताण पडू न देण्यासाठी हलके पाणी द्यावे.

**रब्बी ज्वारी–** पेरणीनंतर १५-२० दिवसांनी पहिली कोळपणी करावी. लष्करी अळीचा प्रादुर्भाव असल्यास : इमामेक्टीन बेन्झोएट ५% – ४ ग्रॅम, किंवा स्पिनेटोरम ११.७ एससी – ४ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फवारणी करताना औषध पोंग्यात पडेल अशाप्रकारे फवारणी करावी.

**रब्बी सूर्यफूल–** पेरणीनंतर २० दिवसांनी पहिली कोळपणी करावी.

**गहू** पिकास आवश्यकतेनुसार पाणी द्यावे. उशीरा पेरणी (१५ डिसेंबरपर्यंत) करता येते. प्रति हेक्टरी बियाणे : १२५ – १५० किलो

**सुचवलेली खत योजना**

१५४ किलो १०:२६:२६ + ५४ किलो युरिया किंवा ८७ किलो डीएपी + ५३ किलो युरिया + ६७ किलो एमओपी किंवा ८७ किलो युरिया +२५० किलो एसएसपी + ६७ किलो एमओपी राहिलेले अर्धे नत्र (८७ किलो युरिया) पेरणीनंतर २५-३० दिवसांनी द्यावे.

**फळबाग व्यवस्थापन**

**केळी** थंडीपासून संरक्षणासाठी पहाटे मोकाट पद्धतीने पाणी द्यावे. घड निसवले असल्यास सच्छिद्र पॉलिथिन पिशवीने घड झाकावेत. बागेत सेंद्रिय पदार्थांचे आच्छादन करावे.

**आंबा** मोहोर चांगला लागण्यासाठी बागेस पाणी देऊ नये. माल-फॉर्मेशन टाळण्यासाठी एनएए – ४ मिली प्रति १० लिटर पाणी फवारावे. फुलधारणा वाढवण्यासाठी ००:५२:३४ – १५ ग्रॅम प्रति लिटर पाणी फवारावे.

**सिताफळ** तयार फळांची काढणी करून सुरक्षित साठवणूक करावी.

**भाजीपाला–** तण नियंत्रणासाठी खुरपणी करावी. आवश्यकतेनुसार पाटाने पाणी द्यावे. तयार भाजीपाला तातडीने काढून घ्यावा. नवीन लागवडींना खतमात्रा द्यावी.

**फुलशेती–** तण विरहित ठेवण्यासाठी खुरपणी करावी. पिकास आवश्यक पाण्याचा पुरवठा करावा. तयार फुले वेळेत काढणी करावी.

**पशुधन व्यवस्थापन–** थंडीपासून संरक्षणासाठी शेळ्या, मेंढ्या व कोंबड्यांच्या शेडला बारदाण्याचे पडदे लावावेत.कोंबड्यांच्या शेडमध्ये इलेक्ट्रिक बल्ब लावावा. पहाटेच्या थंड वाऱ्यात पशुधन बाहेर बांधू नये; गोठ्यात ठेवावे.

**द्राक्ष** जिब्रलिक सिड २० पीपीएमची फवारणी करावी.

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात जिल्हा विदर्भात अव्वल

## युवकांनी लाभ घेण्याचे जिल्हा उद्योग केंद्राचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती,:** राज्य शासनाच्या 'मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम' योजनेच्या अंमलबजावणीमध्ये जिल्ह्याने विदर्भात प्रथम क्रमांक, तर राज्यात सहावे स्थान पटकावले आहे. जिल्ह्याला आर्थिक वर्ष २०२५-२६ करिता १ हजार ६०० कर्ज प्रकरणे मंजूर करण्याचे लक्ष्यांक असताना, नोव्हेंबर २०२५ अखेरपर्यंत जिल्हा प्रशासनाकडून बँकांना एकूण २ हजार ४८० कर्जप्रकरणे पाठवण्यात आली आहेत. यापैकी ५११ प्रकरणांना बँकांकडून मंजुरी मिळाली आहे. राज्यातील युवक-युवतींच्या सर्जनशीलतेला वाव देऊन स्वयंरोजगारास प्रोत्साहन देण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. वाढत्या बेरोजगारीवर उपाय म्हणून युवकांना नोकरी शोधण्याऐवजी स्वतःचा व्यवसाय उभारण्यास प्रोत्साहन देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. पात्र लाभार्थ्यांना प्रवर्गनिहाय एकूण प्रकल्प खर्चाच्या १५ ते ३५ टक्क्यांपर्यंत अनुदान दिले जाते. या योजनेत उत्पादन करणाऱ्या उद्योगांसाठी १ कोटी रुपयांपर्यंत कर्ज मिळू शकते, तर अनुदानाची कमाल मर्यादा १७.५० लाख रुपये आहे. सेवा उद्योगांसाठी ५० लाख रुपयांपर्यंत कर्ज असून अनुदानाची मर्यादा ७ लाख रुपयांपर्यंत आहे. ग्रामीण भागात व्यवसाय उभारल्यास शहरी भागापेक्षा १० टक्के अधिक अनुदान मिळते. तसेच, मागास प्रवर्ग, महिला, दिव्यांग, माजी सैनिक आणि अल्पसंख्यांक यांना अतिरिक्त अनुदानाची तरतूद आहे. अर्ज करण्यासाठी १८ वर्षे वय असणे आवश्यक असून वयाची कमाल मर्यादा नाही. अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन असून अधिकृत पोर्टलवर अर्ज भरता येतो. या योजनेची अंमलबजावणी जिल्हा उद्योग केंद्र आणि खादी ग्रामोद्योग मंडळ यांचेमार्फत केली जाते. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनामुळे जिल्ह्यात या योजनेला गती मिळाली आहे. दर महिन्याला सर्व बँकर्स, जिल्हा अग्रणी बँक प्रबंधक व यंत्रणांची सभा घेऊन योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेत आहेत. जिल्हा अग्रणी बँक प्रबंधक नरेश हेडाऊ यांच्याकडून बँकांना उद्दिष्टपूर्तीसाठी सूचना देण्यात येत आहेत. या योजनेत आतापर्यंत राष्ट्रीयकृत बँकांकडूनच कर्ज प्रस्तावाना मंजुरी मिळाली आहे. खासगी बँकांकडून कर्ज प्रस्तावांना मंजुरी देऊन त्यांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. यासाठी जिल्हाधिकारी यांनी खासगी बँकांवर कारवाई करण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश जिल्हा अग्रणी बँक प्रबंधकांना दिले आहेत. जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक निलेश निकम यांच्या नियोजनात जिल्हास्तरावर योजनेची माहिती देण्यासाठी मार्गदर्शन शिबिरे आयोजित केली जात आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील युवकांनी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# शहरी भागात ६९९२ तर ग्रामीण भागातील ३१ हजार १०१ घरांचे झाले सर्वेक्षण

## कुष्ठरोग शोध मोहिमेत १६ नवीन रुग्ण आढळले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११ दर्यापुर –** आरोग्य विभागातर्फे राबवण्यात आलेल्या कुष्ठरोग शोध मोहिमेअंतर्गत तालुक्यात १६ नवीन असांर्गीक तर ८४७ संशयित रुग्ण आढळून आले आहेत. ही शोघ मोहीम दर्यापूर शहरात येथील सामान्य रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.संतोष डाबेराव व ग्रामीण भागात तालुका आरोग्य अधिकारी डॉ.सचिन गोळे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे राबवण्यात आली आहे. तालुक्यात कुष्ठरोग शोध मोहीम १७ नोव्हेंबर पासून राबवण्यास सुरूवात करण्यात आली आहे. शहरासह ग्रामीण भागात वेगवेगळ्या पथकातर्फे ही शोध मोहीम राबवण्यात येत आहे. पथकांमध्ये आशा वर्कर व स्वयंसेवकाचा समावेश होता. आशा वर्कर ही महिलांची तर स्वयंसेवकांनी पुरुषांची तपासणी केली. तालुक्यात एकूण घरांची संख्या ३८ हजार ९३ आहे. त्यामध्ये शहरी भागात ६ हजार ९९२ तर ग्रामीण भागात ३१ हजार १०१ एवढी संख्या आहे. त्यापैकी शहरी भागातील ६ हजार १२२ तर ग्रामीण भागातील ३१ हजार ११ घरांचे सर्वेक्षण झाले आहे. शहरी भागात झालेल्या सर्वेक्षणाची टक्केवारी ८८ टक्के तर ग्रामीण भागातील टक्केवारी ९५.७७ टक्के आहे. कुष्ठरोग शोधमोहीमेत तपासणीसाठी एकूण १०६ पथकांची नियुक्ती करण्यात आली होती. शहरी भागातील स्लम भागात जाऊन व ग्रामीण भागातील घरोघरी जाऊन पथकाने तपासणी केली आहे. देखरेखीसाठी २१ सुपरवायझारांची नियुक्ती करण्यात आली होती. कुष्ठरोग तंत्रज्ञ विलास देशमुख,कुष्ठरोग तंत्रज्ञ मिनल इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य पर्यवेक्षक, आरोग्य सेवक व आरोग्य सेविका, गटप्रर्वतीका यांचा मोहीमीत समावेश होता.

**१६ बाधित झालेल्या रुग्णांवर उपचार**

शोध मोहिमेत मिळून आलेल्या कुष्ठरोग रुग्णांवर तातडीने उपचार सुरू करण्यात आले आहेत. तर संशयित ८४७ रुग्ण आढळून आले आहेत. त्यामध्ये शहरी भागात १६८ ग्रामीण भागात ६७९ रुग्णाचा समावेश आहे. संशयितांची वैद्यकीय अधिकारी यांच्या मार्फत तपासणी करण्यात आली आहे.

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. ११ डिसेंबर २०२५

शहर/ग्रामिण

# भाजपकडून लढण्यासाठी इच्छुकांची तुफान गर्दी

# पहिल्या दिवशी १७९ इच्छुकांची अर्ज उचल

### माजी नगरसेवकांसह नवीन चेहऱ्यांचा समावेश, भाजप कार्यालय पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी हाऊसफुल्ल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

आगामी महापालिका निवडणुकीत भाजपकडून लढण्यासाठी अनेक इच्छुक बाशिंग बांधून तयार आहे. अर्ज वितरणाच्या पहिल्या दिवशी राजापेठ स्थित शहर कार्यालयावर पदाधिकारी आणि कार्यकत्यांची मोठी गर्दी उसळली होती.

यामध्ये माजी नगरसेवकांसह अनेक नवीन चेहऱ्यांनी हजेरी लावली होती. विशेषतः महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांची झुंबड लक्षणीय होती.

यावेळी भाजपचे निवडणूक



प्रमुख जयंत डेहनकर, माजी खा. नवनित राणा, शहराध्यक्ष डॉ नितीन धांडे, सरचिटणीस बादल कुळकर्णी, रवींद्र खांडेकर, भाजप प्रवक्ता शिवराय कुलकर्णी, प्रा. दिनेश सूर्यवंशी आदींच्या उपस्थितीत सुमारे १७९ इच्छुकांनी अर्जाची उचल केली.

भाजपा कार्यालयात बुधवार १० ते १२ डिसेंबर २०२५ पर्यंत सर्व प्रभागांच्या इच्छुक उमेदवारांसाठी सकाळी १०.०० ते सायकाळी ५.०० वाजेपर्यंत हे फार्म उपलब्ध असणार आहेत. या फॉर्मसाठी सर्वसाधारण गटाकरिता १००० रुपये शुल्क आकारले जाणार असून राखीवगटा करिता अनु. जाती व अनु. जमाती ना.मा.प्र. तसेच महिला आरक्षण गटातील उमेदवारसाठी ५०० रु. शुल्क आहे.भरलेल्या अर्जासह १३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजेपासूनप्रभागक्रमांक ०१ तेप्रभाग क्रमांक ११ च्या इच्छुक उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखत घेतल्या जाणार आहे. तसेच १४ डिसेंबर २०२५ रोजी प्रभाग क्रमांक ११ ते प्रभाग क्रमांक २२ या प्रभातील इच्छुक उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखत सकाळी १०.०० वाजेपासून प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात यईल.

भाजपकडून निवडणूक लढविणाऱ्या इच्छुकांनी दिलेल्या मुदतीमध्ये अर्ज घेत दाखल करावा, असे आवाहन शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी केले.

## अचलपूर नगरपरिषदेतून दोघांची माघार

# एका नगराध्यक्ष, ३४ सदस्य पदांसाठी २० डिसेंबरला मतदान

### आज निवडणूक लढविणाऱ्यांची यादी प्रसिद्ध होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ अचलपूर**





अंजनगाव सुर्जीच्या नगराध्यक्षपदाकरिता सात तर २८ सदस्य पदाकरिता १७३ व इतर नगरपरिषदेत सदस्यांच्या सहा जागांवर ३१ अशा २११ उमेदवारांकरिता २० डिसेंबर रोजी मतदान होत आहे. याअंतर्गत आयोगाने न्यायालयाच्या आदेशाने उमेदवारांना बुधवारी नामांकन मागे घेण्याकरिता संधी देण्यात आली होती. यामध्ये अचलपूर नगरपरिषदेतून केवळ दोघांची माघार घेतली. त्यामुळे आता २० डिसेंबरला मतदान होणाऱ्या सर्व पालिकेत २०९ उमेदवार रिंगणात आहेत.

नगरपरिषदेच्या काही उमेदवारांनी न्यायालयात केलेल्या याचिकेनंतर निवडणूक आयोगाने जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी नगराध्यक्ष पदासह सर्वच २८ सदस्यपदाची निवडणूक १८ दिवस पूढे ढकलली. तसेच दर्यापूर, अचलपूर, वरुड, धारणी येथील सहा प्रभागातील सदस्यपदाची निवडणूक रद्द करीत सुधारीत कार्यक्रम जाहिर केला आहे. त्यामुळे येथे आता २० डिसेंबरला मतदान व २१

डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. अंजनगाव सुर्जीमध्ये एका नगराध्यक्षपदा करिता सात तर २८ सदस्यपक्षाकरिता १७३ उमेदवार रिंगणात होते. तसेच दर्यापूर येथील २ (अ) या प्रभागात ६, अचलपूर प्रभाग क्रमांक १० (अ) मध्ये ९, १९ (ब) मध्ये ८, वरुड नगरपरिषदेत प्रभाग क्रमाक १२ (अ) मध्ये २, धारणी नगरपंचायत मधील १४ मध्ये ४ आणि १६ मध्ये २ असे ३१ उमेदवार रिगणात होते. असे एकूण नगराध्यक्षपदाच्या सात उमेदवारांसह सदस्यांच्या ३४ पदांकरिता २०४ उमेदवारांचा समावेश आहे.

या उमेदवारांना बुधवारी नामांकन अर्ज मागे घेण्याची संधी देण्यात आली होती. यामध्ये अचलपूर येथील दोन सदस्यांनी माघार घेतली असून इतर सदस्य जैसे थे आहेत. त्यामुळे आता अचलपूरमध्ये रिगणात असलेल्या १७ पैकी १५ उमेदवार रिंगणाम कायम आहेत. त्यामुळे सदस्य पदासाठी २०२ तर नगराध्यक्षपदासाठी सात असे २०९ उमेदवार निवडणूक लढविणार आहे. गुरुवारी या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करून त्यांना चिन्हांचे वाटप केले जाणार आहे. त्यानंतर ९ दिवस प्रचाराकरिता मिळणार आहे.

### तळेगाव ठाकूरच्या विचूरी शिवारातील घटना

# जिवंत विजताराच्या स्पर्शाने तीन म्हैशी दगावल्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ तिवसा–**



तालुक्यातील तळेगाव ठाकूर ते विचूरी शेत शिवारातील पांदन रस्त्यावर विद्युत खांबवरील तुटून पडलेल्या जिवंत विजताराचा स्पर्श झाल्याने तीन म्हशी जागीच दगावल्याची घटना घडली. या घटनेत शेतकरी महेश मलमे (रा. गुरुदेव नगर) यांचे अडीचलाख रुपयाचे नुकसान झाले असून ते देखील थोडक्यात बचावले. वीज वितरण विभाग व लाईनमन कर्मचाऱ्यांच्या हलकर्जीपणामुळे सातत्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत असून आज या विभागाचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. नादुरुस्त डीपी, विद्युत खांब अशा विविध समस्येने शेतकऱ्याचे आधीच मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असताना तळेगाव ठाकूर विचुरी या शेतशिवारात शेतकरी महेश मलमे हे नियमित आपल्या म्हशी चराईसाठी घेऊन जातं असताना पांदण रस्त्या लगत पडून असलेल्या जिवंत विजतारांचा जबरदस्त धक्का लागल्याने त्यांच्या तीन म्हशी जागीच दगावल्याची घटना सामोरं आली आहे. सुदैवाने श्री. मलमे हे थोडक्यात बचावले मात्र त्यांच्या संपूर्ण घराचा उदरनिर्वाह हा म्हशीवर अवलंबून असल्यामुळे त्यांनी वीज वितरण विभागाकडे नुकसान भरपाईची मागणी केली आहे.या घटनेची माहिती मिळताच तिवसा वीजवितरण विभागातील अधिकारी घटनास्थळी उपस्थित झाले होते. यावेळी युवक काँग्रेसचे जसबीर ठाकूर, मोझरीचे उपसरपंच प्रशांत प्रधान, अतुल लोमटे, प्रवीण मलमे, अंकुश बायस्कर, सुनील पिटकर, दिनेश मिराशे, मनोज बायस्कर, सोहम राऊत, विशाल शेडके, शंकर वानखडे आदी शेतकरी उपस्थित होते.

# अमरावती रेल्वे स्टेशन स्थलांतराला विदर्भ राज्य आंदोलन समितीचा विरोध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती–** अमरावती रेल्वे स्टेशनच्या प्रस्तावित स्थलांतराविरोधात विदर्भ राज्य आंदोलन समिती आणि समविचारी संघटनांनी आज, गुरुवारी, ११ डिसेंबर रोजी राजकमल चौकात धरणे आंदोलन केले. सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत हे आंदोलन करण्यात आले. समितीचे पश्चिम विदर्भ अध्यक्ष प्राचार्य डॉ. पृथ्वीराजसिंह राजपूत आणि महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष रंजनाताई मामर्डे यांनी या आंदोलनाची घोषणा केली.



या स्थलांतरामागे भूमाफियांनी रचलेले मोठे षडयंत्र असल्याचा आरोप समितीने केला आहे. या षडयंत्राचाच एक भाग म्हणून आधी राजकमल आणि जयस्तंभ चौकातून रेल्वे स्टेशन चौक व हमालपुऱ्याकडे जाणारा उड्डाणपूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. आता थेट मॉडेल रेल्वे स्टेशनच स्थलांतरित करण्याची भाषा केली जात आहे, असे समितीचे म्हणणे आहे. यामागे काही लोकप्रतिनिधी आणि शहरातील भूमाफियांचा हात असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.

डॉ. राजपूत यांच्या मते, अमरावतीचे रेल्वे स्टेशन केवळ एक इमारत नसून, ते शहराचा इतिहास, संस्कृती, लोकव्यवहार, अर्थकारण, सामाजिक आणि शैक्षणिक जीवन तसेच दळणवळणाशी घट्ट जोडलेले आहे. याचे स्थलांतरण म्हणजे केवळ लोखंडी रुळ हलवणे नव्हे, तर शहराच्या ओळखीवर आणि नागरिकांच्या हक्कांवर गंभीर परिणाम करणारा हा एक प्रहार आहे.

लोकांचा आवाज न ऐकता किंवा शहराच्या हिताचा विचार न करता केले जाणारे स्थलांतर हे लोकशाही प्रक्रियेचा अपमान ठरेल, असेही समितीने म्हटले आहे. सार्वजनिक सुविधा, शहर नियोजन आणि गुंतवणूक हे सर्व नागरिकांचे हक्काचे विषय आहेत. अशा मोठ्या बदलांसाठी योग्य सर्वेक्षण, नागरिकांचा सल्ला आणि सार्वजनिक चर्चा आवश्यक आहे. गुप्तपणे, भूमाफियांसोबत हातमिळवणी करून गैरमार्गाने केलेले बदल शहराच्या हितासाठी धोकादायक ठरतात आणि भविष्यात गंभीर अडचणी निर्माण करू शकतात, अशी भीतीही व्यक्त करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आगरकर, कोअर कमिटी सदस्य प्रा. प्रकाश लड्ढा, सरलाताई सपकाळ, डॉ. पद्मा राजपूत, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष सुषमा मुळे, शहर अध्यक्ष रियाज खान, महानगर अध्यक्ष डॉ. विजय कुबडे, समन्वयक सतीश प्रेमलवार, संघटक पांडुरंग बिजवे आदी उपस्थित होते.

### शिराळा येथील युवकाचे अर्धवट जळलेले मृतदेह प्रकरण

# बेपत्ता ५५० पैकी १९ युवकांच्या हातावर ओम टॅटू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती** शिराळा गावालगत ९ नोव्हेंबर रोजी अनोळखी युवकाचा मृतदेह अर्धवट जळलेल्या अवस्थेत मिळाला होता. या प्रकरणात वलगाव पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध सुरू केला. संबंधित प्रकरणात गुन्हेशाखेच्या पथकाने राज्यातील बेपत्ता ५५० युवकांची माहिती घेतली असून त्यापैकी १९ युवकांच्या उजव्या हातावर ओमचा टॅटू असल्याचे उघड झाले. त्यामुळे पोलीस त्या १९ युवकांची माहिती घेत आहेत.

९ नोव्हेंबर रोजी एका शेतात युवकाचा मृतदेह अर्धवट जळलेल्या अवस्थेत दिसला होता. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली असता त्यांना घटनास्थळापासून काही अंतरावर एक चाकू आणि मृतकाच्या खिशात खर्रा मिळाला. त्या आधारावर पोलीस मृतकाची ओळख पटविण्याकरिता मध्यप्रदेशपर्यंत पोहचले, मात्र कुठेच पत्ता लागला नाही. सोबतच पोलिसांनी अनेक मार्गावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्याची पाहणी केली परंतु पोलिसांना मध्यप्रदेशातून खाली हात परतावे लागले. त्यामुळे गुन्हेशाखेचे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांनी ९ नोव्हेंबर ते १ डिसेंबर दरम्यान राज्यातील १८ ते ३० वर्ष वयोगटातील बेपत्ता झालेल्या युवकांची माहिती घेतली. महाराष्ट्रातून ५५० युवक बेपत्ता झाले असून त्यापैकी १९ युवकांच्या उजव्या हातावर ओमचा टॅटू काढलेला आहे, अशी माहिती पुढे आली. मृताच्या उजव्या हातावर ओमचा टॅटू असल्यामुळे शहर पोलिसांनी १९ युवकांची पूर्ण माहिती व एफआयआर संबंधित ठाणेदाराला मागितला असुन प्रत्येकांची विस्तृत माहिती घेतली जात आहे. तसेच आतापर्यंत मृतकाची ओळख पटवीण्याकरिता शहर पोलिसांनी ३ हजार लोकांच्या मोबाईलचा डेटा घेतला. त्यापैकी १८० मोबाईलधारक संशयाच्या भोवऱ्यात होते. त्या १८० मोबाईल धारकांची माहिती घेऊन त्यांचे लोकेशन घेतले. तसेच त्यांचा प्रत्येक कॉल पोलीस तपासत आहेत.

# आचारसंहितेची चाहूल; मनपात कामकाजाला वेग

# आधी मनपा की जिल्हा परिषद ?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती–** आगामी महानगरपालिका निवडणुकीची प्रक्रिया वेगाने पुढे सरकत असून आगामी काही दिवसांत आचारसंहिता लागू होण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे. यामुळे महापालिकेच्या प्रशासकीय कामकाजाला मोठा वेग आला आहे. आचारसंहिता लागू होण्यापूर्वी प्रलंबित असलेली महत्त्वाची विकासकामे पूर्ण करण्यासाठी विभागांकडून युद्धपातळीवर हालचाली सुरू आहेत.

प्रशासकीय मंजुरी, निविदा प्रक्रिया, निधी वितरण, तसेच सुरु असलेल्या कामांचे देयक निपटारा या बाबींना गती देण्यात येत असून अधिकारी व कर्मचारी यांना वेळेवर कामे पूर्ण करण्याचे निर्दे श देण्यात आले आहेत. दुसऱ्या बाजूला, राजकीय पक्षांनीही आगामी निवडणुकीची तयारी वेगाने सुरू केली आहे. उमेदवारी, प्रभागनिहाय रणनीती,बूथनिहाय संघटन या घडामोडींमध्ये पक्ष व्यग्र झाले असून आचारसंहिता लागू होण्यापूर्वी जनसंपर्क आणि संघटन मजबूत करण्यावर भर देत आहेत. आचारसंहिता लागू होताच प्रशासकीय व राजकीय हालचालींना नियमबद्ध कक्षेत काम करावे लागणार असल्याने दोन्ही स्तरावर सध्या 'रनिंग मोड' दिसत आहे.







सध्या निवडणुकीपूर्वी कामे वेगात आटोपण्याची चुरस निर्माण झाली असून, आचारसंहिता कधीही लागू होऊ शकते, अशी चर्चा आहे.निवडणूक आयोगाने यापूर्वी प्रथम जिल्हा परिषद व नंतर महानगरपालिका निवडणुका घेण्यात संदर्भातील सूचना दिल्या होत्या मात्र ऐनवेळी महापालिका निवडणुका पूर्वी घेतल्या जातील, असे कामकाजावरून दिसून येत असल्याने जिल्हा परिषद निवडणुका पुन्हा मागे पडतील का, असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# ध्वजदिन निधी संकलनात जिल्ह्याची उत्कृष्ट कामगिरी

# राज्यपालांच्या हस्ते जिल्हाधिकाऱ्यांचा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती,**

ध्वजदिन निधी संकलनात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचा सत्कार करण्यात आला. मुंबई येथील लोकभवनातील जय विहार येथे हा कार्यक्रम पार पडला.



राज्यपाल यांच्या स्वाक्षरीचे प्रशस्तीपत्र आणि स्मृती चिन्ह असे गौरवाचे स्वरूप आहे.

सत्कारावेळी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर आनंद पाठारकर उपस्थित होते. जिल्ह्याला २०२४–२५ या वर्षासाठी १ कोटी २३ लाख रूपयांचे लक्ष्य देण्यात आले. त्या तुलनेत १ कोटी ६४ रूपयांचा निधी संकलित करण्या आला. जिल्ह्याने निधी संकलनात अमरावती विभागात अव्वल स्थान पटकावले असल्याने हा सन्मान करण्यात आला. संकलित निधी माजी सैनिक आणि त्यांच्या अवलंबितांच्या कल्याणासाठी उपयोगात आणल्या जाणार आहे.

# महसुलच्या खनीज भरारी पथकावर हमला करुन ट्रॅक्टर पळवला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११दर्यापूर** अवैध गौण खनिज भरारी पथकाने दि.८ रात्रीच्या सुमारास सहकार नगर चौफुलीवर अवैधरित्या १ ब्रॉस रेती वाहतूक करणारी ट्रॅक्टर–ट्राली ताब्यात घेतली. त्यानंतर तहसील कार्यालयाच्या प्रवेशद्वार जवळ महसूल सेवकावर हल्ला करून ट्रॅक्टर–ट्राली पळवून नेली आहे. या घटनेने महसूल प्रशासन व वाळू माफिया चांगलेच चर्चेत आले आहे.रविवार रात्री तलाठी प्रदिप गिते, मंडळ अधिकारी राजेश मिरगे,तलाठी रविकांत भटकर, तलाठी तुळशीराम चतुर, तलाठी योगेश नागरे, महसूल सेवक चक्रधर बेलसरे, योगेश भोकरे, सुनील डोंगरे, हे गस्तीवर असताना सहकार नगर चौफुलीवर रेतीची अवैधरित्या वाहतूक करणारा मोहसीन कांगडा,शिवा गुंल्हाने यांच्याकडून विना क्रमांक ट्रॅक्टर–ट्राली रंगेहाथ पकडण्यात आली. दरम्यान कारवाईत ताब्यात घेतलेली ट्रॅक्टर–ट्राली तहसील कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारापर्यंत आणला. पथकातील कर्मचारी तहसील चे मुख्य गेट उघडत असतांना मोहसीन कांगडा,शिवा गुंल्हाने यांनी ट्रॅक्टर चालक महसुल सेवक चक्रधर बेलसरे यास खेचून अरेरावीची भाषा वापरुन लाथा बुक्यांनी मारहाण करीत पथकावर हल्ला केला. व ताब्यातील ट्रॅक्टर भरधाव पळवून नेला.

# महिलेच्या गळ्यातील ४८ ग्रॅम सोन्याचे दागिने हिसकले

### बाईकस्वार दोन बुरखाधारी पसार, शंकर नगर रस्त्यावरील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती–** गेल्या काही दिवसांपासून शहरात चेन स्नॅचर्स दहशत पसरवत आहेत. अशातच कचरा टाकण्यासाठी बाहेर निघालेल्या महिलेच्या गळ्यातील ४८ ग्रॅम सोन्याचे दागिणे हिसकून दोन बुरखाधारी बाईकस्वारांनी पळ काढला. ही घटना शंकर नगर–केडिया नगर रस्त्यावर घडली. महिलेच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी दोन अज्ञात संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू

केला आहे. माहितीनुसार, राजापेठ पोलिस स्टेशन परिसरातील रहिवासी सकाळी कचरा तक्रारदार टाकण्यासाठी बाहेर पडली होती. कचरा नाल्यात टाकून घरी परतत असताना, मोटारसायकलवरून आलेले दोन बुरखाधारी पुरुष अचानक किराणा दुकानासमोर आले आणि त्यांनी महिलेच्या गळ्यातील दोन सोन्याच्या चेन हिसकावून पळ काढला.



महिलेच्या म्हणण्यानुसार, दोन्ही आरोपी २५ ते ३० वर्षांच्या दरम्यान होते आणि त्यांनी तोंडावर रुमाल बांधला होता. यामध्ये एक २२.३ ग्रॅम आणि २८ ग्रॅमची सोन्याची साखळी होती. या दागिण्यांची किंमत ५ लाख ३ हजार एवढी आहे. महिलेने राजापेठ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. पोलिस जवळच्या सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करत आहेत आणि आरोपींचा शोध घेत आहेत.

# कडाक्याच्या थंडीमुळे सर्दी-ताप- खोकल्याच्या रुग्णांत मोठी वाढ

## शाल, जर्किन, टोप्या, घालून शेकोट्याचा घेतला जातो आधार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

गेल्या आठवड्यापासून थंडीचा प्रकोप दिवसेंदिवस वाढत चालला आहे. पहाटेच्या वेळी दाट धुके, बोचऱ्या वाऱ्याचे झोत आणि दिवसभर कायम राहणारा तीव्र गारवा यामुळे तापमानात मोठी घसरण जाणवत आहे. विशेषतः पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत थंडीचा तडाखा कायम असल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होऊ लागले आहे. हवामानातील अचानक बदलामुळे तब्येतीवर परिणाम होत असून सर्दी, ताप, खोकला, अंगदुखी, दम लागणे आणि श्वसनाच्या त्रासाची तक्रार करणाऱ्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढू लागली आहे. अनेक जण उपचारासाठी दवाखान्यांकडे धाव घेत असल्याने दिसून येत आहे.

स्थानिक ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, खाजगी दवाखाने तसेच इतर रुग्णालयातही रुग्णांची गर्दी वाढताना दिसत आहे. दिवसभर गारवा असल्याने लोक बाहेर पडण्यासाठी टाळाटाळ करीत आहे. सकाळी हवेत चिडचिड करणारा गारवा जाणवत असल्याने लोक सकाळी घराबाहेर पडणं टाळत आहेत. दिवसभर गारवा कायम राहत असल्याने शाळकरी मुले, प्रवासी, दैनंदिन कामगार आणि शेतकरी वर्ग अडचणीत आहेत. संध्याकाळी सहा वाजताच वातावरणात आणखी थंडी जाणवू लागते. रस्त्यावर फिरणाऱ्या लोकांनी स्वेटर, जॅकेट, मफलर, टोप्या आणि हातमोजे घालणे आवश्यक बनले आहे. रात्री तापमान झपाट्याने घसरत असल्याने बहुतेक नागरिक जेवणानंतर घराबाहेर न पडणे पसंत करत आहेत. दूरची जेवणाची निमंत्रणे, कार्यक्रम किंवा सोहळे लोक थंडीमुळे नाकारत आहेत.

डॉक्टर, नर्स आणि आरोग्य कर्मचारी या वाढलेल्या गर्दीमुळे व्यस्त आहेत. खासकरून ५ वर्षांखालील मुले आणि ६० वर्षांवरील वृद्धांमध्ये आजाराचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून येत आहे. अंगदुखी, घश्यात खवखव, श्वास घेण्यास त्रास, ताप न उतरणे यांसारख्या तक्रारी अधिक दिसत आहेत. पुढील काही दिवस थंडी कायम राहण्याचा अंदाज बोलल्या जात असून काही दिवसांत तापमानात आणखी घट होण्याची शक्यता



वर्तवली आहे. त्यामुळे नागरिकांनी थंडीपासून बचावासाठी काळजी घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.या वर्षीची थंडी जणू काही ठरवूनच आलेली आहे. रात्री उशिरा पेटलेली शेकोटी आता सकाळीही तेवताना दिसते. गावोगाव चहाच्या टपऱ्यांसमोर, बसस्थानकाजवळ, शेताच्या बांधावर जिथे-जिथे लोकांची पावले पडतात, तिथे उब मिळवण्यासाठी छोट्या मोठ्या शेकोट्या झळकताना दिसतात. थंडीचा जोर एवढा वाढला आहे की सूर्योदय झाल्यावरही लोक उबदार कपड्यांसह शेकोटीचा आधार घेताना दिसतात. कामगार, प्रवासी, विद्यार्थी प्रत्येकजण काही क्षण त्या आगीसमोर थांबून दिवसाची सुरुवात करताना दिसतो. थंडी कितीही तीव्र असली तरी एक छोटीशी जळणारी शेकोटी सकाळचा थकवा घालवण्याचं काम करत आहे. शेकोटीच्या आजूबाजूला बसलेली माणसं हे आपल्याकडच्या ग्रामीण संस्कृतीचं अजूनही जिवंत उदाहरण. थंडीने जगाला थरथरवले तरी माणसांच्या नात्यांना जोडून ठेवण्याचं काम ही लहानशी शेकोटी आजही करत आहे.

# मतमोजणीचा क्रम निश्चित: आधी नगरसेवक, सर्वात शेवटी नगराध्यक्षांच्या निकालाची घोषणा होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती-** आगामी २१ डिसेंबर रोजी होणाऱ्या १० नगरपालिका आणि दोन नगरपंचायतींच्या मतमोजणीचा क्रम निश्चित करण्यात आला आहे. यानुसार, आधी नगरसेवकांची मते मोजली जातील आणि त्यानंतर नगराध्यक्षांच्या मतांची मोजणी होईल. त्यामुळे, संबंधित नगरपालिका आणि नगरपंचायतींमधील नगरसेवक पदाचे निकाल जाहीर झाल्यानंतरच सर्वात शेवटी नगराध्यक्षांच्या निकालाची घोषणा केली जाईल.

नगराध्यक्षांच्या तुलनेत नगरसेवकांचा मतदारसंघ लहान असतो. नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारांना शहरातील सर्व मतदारांनी मतदान केले आहे, तर नगरसेवकांसाठी केवळ त्या-त्या प्रभागातील मतदारांनीच मतदान केले आहे. यामुळे नगरसेवकांची मतमोजणी लवकर पूर्ण होईल. नगराध्यक्षांचा निकाल लावण्यासाठी त्यांना प्रत्येक प्रभागात मिळालेल्या मतांची एकत्रित बेरीज करावी लागणार आहे.

जिल्ह्यात अंजनगाव सुर्जी नगरपालिका वगळता दर्यापूर, अचलपूर, चिखलदरा, चांदूर बाजार, मोर्शी, वरुड, शेंदुरजना घाट, चांदूर रेल्वे आणि धामणगाव रेल्वे या नऊ नगरपालिकांसाठी तसेच धारणी व नांदगाव खंडेश्वर या दोन नगरपंचायतींसाठी गेल्या २ डिसेंबर रोजी मतदान पार पडले. जिल्ह्यात सरासरी ६८.३८ टक्के मतदान झाले होते.

जिल्हा प्रशासनाने प्रत्येक नगरपालिका व नगरपंचायतीची मतमोजणी त्या-त्या



शहराच्या मुख्यालयी ठेवली आहे. काही ठिकाणी ती तहसील कार्यालयात, तर काही ठिकाणी नगरपालिका सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. नांदगाव खंडेश्वरची मतमोजणी तेथील शासकीय आयटीआयमध्ये, तर अचलपूरची कल्याण मंडपम या खासगी जागेत होणार आहे. सर्व ठिकाणची मतमोजणी सकाळी १० वाजता सुरू केली जाईल. नगरसेवकांचे सर्व निकाल जाहीर झाल्यानंतरच नगराध्यक्षपदाचा अंतिम निकाल घोषित होईल.

दरम्यान, ज्या शहरांमध्ये निवडणूक दोन टप्प्यांत झाली आहे, तेथील काही मतदारांना दुसऱ्यांदा मतदान करावे लागणार आहे. अशा मतदारांच्या कोणत्या बोटाला शाई लावावी, याबाबत संभ्रम निर्माण झाला होता. निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे की, अशा मतदारांच्या डाव्या हाताच्या मधल्या बोटाला शाई लावावी. यापूर्वी २ डिसेंबर रोजी झालेल्या निवडणुकीत या मतदारांनी एका नगरसेवकासाठी आणि नगराध्यक्षासाठी मतदान केले होते. आता उर्वरित एका नगरसेवकासाठी २० डिसेंबर रोजी मतदान होणार असल्याने, त्यावेळी त्यांच्या डाव्या हाताच्या मधल्या बोटाला शाई लावली जाईल.

# १५ डिसेंबरला शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर अमरावतीत बैठक

## आदिवासी विकास आयुक्तांच्या निर्देशानुसार 'एटीसी' कार्यालयात चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

नागपूरच्या विधिमंडळ अधिवेशनावर धडकलेल्या आदिवासी शेतकऱ्यांना अखेर दिलासा मिळाला आहे. किमान आधारभूत किमतीनुसार (एमएसपी) मका पिकाची खरेदी आणि मेळघाटातील इतर समस्यांवर चर्चा करण्यासाठी १५ डिसेंबर रोजी अमरावती येथे बैठक आयोजित करण्यात आली आहे. आदिवासी विकास विभागाच्या अपर आयुक्त कार्यालयात (एटीसी) ही चर्चा होणार आहे.



बुधवारी सकाळी आंदोलनकर्ते नागपुरात दाखल होताच, यशवंत स्टेडियम येथे आदिवासी विकास विभागाच्या उच्चाधिकाऱ्यांनी त्यांच्याशी चर्चा केली. राज्य सरकारच्या निर्देशानुसार, आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त आयुषी आणि नाशिक आयुक्तालयातील उपायुक्त संतोष ठुबे यांनी आंदोलनकर्त्यांशी सविस्तर चर्चा केली. त्यांच्या निवेदनातील सर्व मुद्दे जाणून घेण्यात आले. या चर्चेनंतर, संबंधित खात्याच्या सचिवांच्या सल्ल्याने अमरावती येथील बैठक निश्चित करण्यात आली. क्षयरोग रुग्णालयामागील एटीसी कार्यालयात सकाळी ११ वाजता ही बैठक सुरू होईल. आदिवासी विकास आयुक्तांनी विभागाच्या सर्व अधिकाऱ्यांना उपस्थित राहण्याचे आणि आंदोलनकर्त्यांच्या मुद्द्यांवर योग्य तोडगा काढण्याचे निर्देश दिले आहेत. आंदोलनकर्त्यांमध्ये लवादा वन, दहेंद्री, बुटीदा, चौराकुंड, धरमडोह, काळविट, जामली आर, पाचडोंगरी, पायविहीर, एकताई, रुईफाटा यासह अनेक गावांमधील शेतकऱ्यांचा समावेश आहे. एमएसपी २४०० रुपये प्रतिक्विंटल असतानाही अचलपूर व चिखलदरा कृषी उत्पन्न बाजार समित्यांसह खुल्या बाजारात मका केवळ ११०० ते १४०० रुपये प्रतिक्विंटल दराने खरेदी केला जात असल्याचा त्यांचा आरोप आहे.

शासनाने मेळघाटात सुरू केलेली सरकारी खरेदी केंद्रे कुचकामी ठरली असून, तेथे नोंदणी होत नाही आणि नोंदणीनंतरही मका खरेदी केला जात नाही, असेही आंदोलनकर्त्यांनी म्हटले आहे. याशिवाय, शिक्षण आणि आरोग्याच्या प्रश्नांकडेही त्यांनी शासनाचे लक्ष वेधले असून, मेळघाटातील काही विद्यार्थ्यांची नागपूर येथील महाविद्यालयांमध्ये अडकलेली शैक्षणिक कागदपत्रे परत मिळवून देण्याची मागणीही केली आहे. या आंदोलनासाठी मेळघाटातील शेतकऱ्यांनी दोन दिवस पदयात्रा केली. पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे यांच्या उपस्थितीत परतवाडा येथील विश्रामगृहासमोरून सोमवारी सकाळी या पदयात्रेला सुरुवात झाली. ही पदयात्रा आसेगाव येथे पोहोचली. मंगळवारी सकाळी सर्वजण नागपूरकडे निघाले.दुपारी वलगाव येथील गाडगेबाबा समाधीस्थळी थांबल्यानंतर प्रशासनाने त्यांना विभागीय आयुक्त कार्यालयात बोलावले होते. परंतु, कोणताही तोडगा निघाला नाही. अखेरीस, आदिवासी विकास मंत्र्यांनी आंदोलनकर्त्यांचे पुढारी ड. बंड्या साने यांच्याशी संपर्क साधून त्यांना नागपूर येथे येण्याची विनंती केली. त्यानुसार, ते रेल्वे व बसने नागपुरात पोहोचले.

# मेळघाटातील रिक्त शिक्षक पदे तात्काळ भरा; बदली शिक्षकांना कार्यमुक्त करा

## अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा - प्रहार शिक्षक संघटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती :**

मेळघाटातील मोठ्या प्रमाणात रिक्त असलेली शिक्षक पदे तातडीने भरावीत आणि बदली झालेल्या शिक्षकांना तत्काळ कार्यमुक्त करावे या प्रमुख मागण्यांसह प्रहार शिक्षक संघटनेने जिल्हा परिषद प्रशासनाला अल्टिमेटम दिला आहे. संघटनेच्या पदाधिकार्यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षणाधिकार्यांना निवेदन देत शिक्षकांच्या प्रलंबित समस्यांकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी



केली. मेळघाटातील अनेक शाळा आजही शून्य शिक्षकी किंवा एक शिक्षकी अवस्थेत असल्याने विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रश्न गंभीर बनला आहे. विभागीय आयुक्त कार्यालयावर आंदोलनानंतर जरी कंत्राटी शिक्षक भरती करण्यात आली असली, तरी अनेक शाळांना शिक्षक न मिळाल्याने प्रशासनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. पेसा क्षेत्रातील धारणी व चिखलदरा पंचायत समित्यांत १६५ कंत्राटी शिक्षकांनी रुजू होऊनही बदली झालेल्या शिक्षकांना कार्यमुक्त न केल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

राहू केंद्रातील तीन शाळा शून्य, चार एक शिक्षकीचिखलदरा तालुक्यातील राहू केंद्रात एकूण नऊ शाळांपैकी पिपल्या, पटेलढाना, कारंजखेडा या तीन शाळा शून्य शिक्षकी आहेत, तर राहू, हिरदा, टेंब्रू, खारी, बिबा या शाळा एक शिक्षकी अवस्थेत आहेत. या शाळांमध्ये शिक्षकांची तातडीने गरज असतानाही नियुक्ती न झाल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# सीईओ संजीता महापात्र तळेगाव शाळेत, विद्यार्थ्यांशी साधला संवाद

## 'गप्पा विथ सीईओ' उपक्रमातून करिअर मार्गदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती -** जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांनी बुधवारी तळेगाव दशासर येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेला भेट दिली. 'गप्पा विथ सीईओ' या उपक्रमांतर्गत त्यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत त्यांची शैक्षणिक प्रगती, आवडीनिवडी जाणून घेतल्या आणि करिअरबद्दल मार्गदर्शन केले. तसेच, शाळेच्या गुणवत्तावृद्धीबाबतही चर्चा करण्यात आली.

यापूर्वीही सीईओ संजीता महापात्र यांनी धारणी आणि चांदूर रेल्वे येथील जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळांमध्ये हा उपक्रम राबवला होता. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवणे, त्यांचे प्रश्न समजून घेणे आणि शिक्षणात नाविन्यपूर्ण बदलांची ओळख करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. आजच्या भेटीत विद्यार्थ्यांनी त्यांना शिक्षण, क्रीडा, करिअर, स्पर्धा परीक्षा, वाचनाची आवड, इंटरनेटचा योग्य उपयोग आणि जीवन कौशल्यांबाबत उत्स्फूर्त प्रश्न विचारले. सीईओ महापात्र यांनी सर्व विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करून



मेहनत, प्रामाणिकपणा आणि शिस्त या गुणांचे महत्त्व पटवून दिले.

त्यांनी शाळेतील सुविधा, वर्गखोल्यांची स्थिती, स्वच्छता, पोषण आहार, डिजिटल शिक्षण आणि वाचनालयाची उपलबधता याबाबत पाहणी केली. आवश्यक त्या सूचनाही शाळा प्रशासनास दिल्या. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी शिक्षकांनी नवकल्पनात्मक पद्धतींचा वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी मुख्याध्यापक प्रकाश राठोड, शिक्षकवर्ग तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# खासदार डॉ. अनिल बोंडे यांची 'रिसर्च-लिंक्ड इन्सेन्टिव्ह'ची मागणी

## वैद्यकीय उपकरणांच्या संशोधनाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारकडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती-** भाजपचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी देशातील मेड-टेक क्षेत्रात संशोधनाला गती देण्यासाठी 'रिसर्च-लिंक्ड इन्सेन्टिव्ह' (आरएलआय) धोरण तातडीने लागू करण्याची मागणी केंद्र सरकारकडे केली आहे. त्यांनी संसदेत हा महत्त्वाचा मुद्दा मांडला.



डॉ. बोंडे यांच्या मते, भारत सध्या आरोग्य क्षेत्राच्या महत्त्वपूर्ण परिवर्तनाच्या टप्प्यावर आहे आणि उच्च दर्जाच्या, परवडणाऱ्या वैद्यकीय तंत्रज्ञानाची गरज झपाट्याने वाढत आहे. उत्पादन-आधारित प्रोत्साहन योजनेमुळे (पीएलआय) उत्पादनाला मदत झाली असली तरी, भारत आजही ७० टक्क्यांहून अधिक उच्चस्तरीय वैद्यकीय उपकरणे आयात करतो. संशोधन, डिझाइन, क्लिनिकल व्हॅलिडेशन आणि पेटंट्सच्या क्षेत्रात मोठ्या उणिवा दिसून येतात, असे त्यांनी निदर्शनास आणले.सन २०२३ मध्ये जाहीर केलेल्या 'राष्ट्रीय फार्मा-मेडटेक आर अँड डी धोरणा'नुसार, देशात नावीन्यपूर्ण संशोधन वाढवण्यासाठी लक्ष केंद्रित सहाय्याची आवश्यकता आहे. आरएलआय मॉडेलद्वारे प्रोटोटाइपपासून ते नियामक मान्यतेपर्यंत संशोधनाच्या सर्व टप्प्यांना प्रोत्साहन मिळू शकते. यामध्ये तंत्रज्ञान सिद्धता पातळी (टीआरएल) आधारित टप्प्याटप्प्याने अनुदान, भारतात सह-निधीत क्लिनिकल ट्रायल्स आणि पेटंट रॉयल्टीवरील करसवलतीचा समावेश करता येईल, असे डॉ. बोंडे यांनी सुचवले. डॉ. बोंडे यांनी सांगितले की, सेमीकंडक्टर, ईव्ही आणि फार्मा क्षेत्रात अशा आर अँड डी आधारित प्रोत्साहन योजनांनी यश मिळवले आहे. अमेरिका आणि सिंगापूरसारख्या देशांमध्येही अशा धोरणांमुळे वेगाने प्रगती साधली आहे. भारतातील मेड-टेक बाजारपेठ २०२३ मधील १२ अब्ज डॉलरवरून २०३० पर्यंत ५० अब्ज डॉलरपर्यंत जाण्याचा अंदाज आहे, असेही त्यांनी नमूद केले.या मागणीला सभागृहात विशेष लक्ष वेधले गेले असून, सरकारकडून यावर सकारात्मक पावले उचलली जातील अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# संत काशिनाथ धाम येथे धार्मिक आणि उत्साहपूर्ण वातावरणात भूमिपूजन

## संत श्री काशिनाथ महाराज पुण्यतिथी महोत्सवाच्या तयारीला प्रारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११नांदगाव पेठ-** २५ डिसेंबर पासून सुरू होणाऱ्या संत श्री काशिनाथ महाराज पुण्यतिथी महोत्सव सोहळ्याच्या तयारीला बुधवारपासून प्रारंभ झाला.धार्मिक आणि उत्साहपूर्ण वातावरणात संत काशीनाथ धाम येथे भाविकांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले.पुण्यतिथी महोत्सव हा नांदगाव पेठ परिसरातील श्रद्धाळू भाविकांसाठी आध्यात्मिक उर्जा देणारा, धार्मिक एकात्मतेचा अनमोल सोहळा मानला जातो. यंदाच्या महोत्सवाची सुरुवात पारंपारिक भूमिपूजन विधीने करण्यात आली असून संत श्री काशिनाथ बाबा संस्थान चे विश्वस्त, पदाधिकारी व असंख्य भाविक याठिकाणी आज उपस्थित होते.

बुधवारी सकाळी ११ वाजता नाफडे पेट्रोल पंपालगत असलेल्या संत श्री काशिनाथ धाम येथे उपस्थित भाविकांच्या हस्ते संत श्री काशिनाथ महाराज यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यांनतर कुदळ मारून भूमीपूजन करण्यात आले तसेच त्याठिकाणी असलेले ट्रॅक्टर, जेसीपी चे पूजन करून संत काशिनाथ धाम येथे



स्वच्छता करण्यात आली.भाविकांनी सुद्धा स्वयंस्फूर्तीने परिसराची स्वच्छता केली. संत काशिनाथ महाराज ऑटो युनियन,जेसीपी, ट्रॅक्टर, बस चालक मालक तसेच परिसरातील सामाजिक संस्था आणि संघटनांनी एकत्र येऊन पुण्यतिथी महोत्सवाला हातभार लावला.

या वर्षीचा पुण्यतिथी महोत्सव २५ डिसेंबरपासून सुरू होणार असून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. भाविकांच्या मोठ्या गर्दीचा विचार करून महोत्सव समितीकडून सुयोग्य नियोजन करण्यात आले असून, कार्यक्रम निर्विघ्न आणि भक्तिमय पद्धतीने पार पाडण्यासाठी सर्व तयारी जोरात सुरू आहे. संत काशिनाथ महाराजांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी दरवर्षी आयोजित केला जाणारा हा महोत्सव, नांदगाव पेठ तसेच परिसरातील सर्व समाजघटकांना एकत्र बांधणारा अध्यात्मिक उत्सव ठरतो. यंदाचा महोत्सवही तेवढाच भव्य, भक्तिमय आणि प्रेरणादायी होईल, असा विश्वास संत श्री.काशीनाथ महाराज संस्थानच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

# कृषी उत्पन्न बाजार समितीत कापूस खरेदीत प्रति हेक्टर क्षमतेची वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११वरुड-** शासनाची कापूस खरेदी सीसीआयमार्फत वरुड तालुक्यात सुरू झाली. शेतकऱ्यांचा प्रति हेक्टर १६ क्विंटल कापूस घेतला जात होता. त्यामुळे शेतकऱ्यांना होणाऱ्या उत्पादनापेक्षा कमी कापूस सीसीआयमार्फत खरेदी केला जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा पूर्ण कापूस यामध्ये बसत नव्हता. शेतकऱ्यांसमोर उर्वरित कापूस कुठे विक्री करायचा असा प्रश्नशेतकऱ्यांना पडला होता. शासकीयखरेदीपेक्षा खाजगी बाजारात कापसाचे भाव कमी होते. कृषी उत्पन्न बाजार समिती क्रूड सभापती नरेंद्र पावडे यांनी खासदार अमर काळे, खासदार डॉ. अनिल बोंडे महाराष्ट्र राज्याचे सहकार भोयर, राज्यमंत्री पंकज सीसीआयचे वरिष्ठ अधिकारी कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांना निवेदन दिले,

शासनाने कृषी विभागाला पत्र देऊन शेतकऱ्यांचे शासकीय कापुसखरेदीमध्ये प्रति हेक्टरी १६ क्विंटल



ऐवजी २२ क्विंटल कापूस खरेदी करावा, असे आदेश दिले आहे. त्यामुळे शेतक खरेदीमध्ये कापूस विकण्याचा मार्ग त्यामुळे शेतकऱ्यांना शासकीय मोकळा झाला. शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेण्याकरिता बोंडे, सहकार राज्यमंत्री पंकज खासदार अमर काळे, डॉ. अनिल भोयर यांनी कृषी उत्पन्न बाजार यांचे शेतकऱ्यांनी आभार मानले समिती वरूनचे सभापती नरेंद्र पावडे आहे.

# रुख्मिणी मातेचे माहेरघर असलेल्या कौंडण्यपूरचा शक्तिपीठ महामार्गात समावेश




विदर्भ प्रजासत्ताक
दि.११अमरावती

श्रीकृष्णाचे सासर व रुख्मिणी मातेचे माहेरघर आणि महाभारतातील पौराणिक असे तीर्थक्षेत्र असलेल्या कौंडण्यपूरचा महाराष्ट्रातील विविध तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या शक्तिपीठ महामार्गात समावेश झाला आहे.श्री अंबा रुक्मिणी सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष रविराज देशमुख यांच्या संकल्पनेतून २७ जून रोजी कौंडण्यपूर येथे आयोजित २११ मीटर साडी अर्पण सोहळ्यास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे कौंडण्यपूर हे शक्तीपीठ महामार्गाला जोडण्याची घोषणा केली होती. यासंदर्भात रविराज देशमुख यांना पत्र प्राप्त झाले आहे.

नागपूर-गोवा शक्तीपीठ द्रुतगती महामार्ग हा ८०२ किमी लांबीचा असून या महामार्गामुळे प्रवासाचा वेळ १३ तासांनी कमी होईल. नागपूर ते गोवा हे अंतर सध्या १ हजार ११० किमी आहे, ते आता ८०२ किमी होईल. हा महामार्ग महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यांमधून आणि गोव्यातील एका जिल्ह्यामधून जाईल. त्याचे व्यवस्थापन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) करणार आहे. महाराष्ट्रातील रस्तेमार्ग सुधारण्यासाठी राज्य सरकारने शक्तिपीठ द्रुतगती महामार्ग बांधण्याचा निर्णय घेतला. या महामार्गामुळे प्रवासाचा वेळ २१ तासांवरून ८ तासांपर्यंत कमी होईल असा दावा केला जात आहे. हा महामार्ग विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांना जोडेल. शिवाय हा महामार्ग महाराष्ट्रातील तीन शक्तिपीठांना जोडतो. या पीठांमध्ये महालक्ष्मी, तुळजाभवानी आणि पत्रादेवी यांचा समावेश होतो.इतर तीर्थस्थळांमध्ये माहूर, पंढरपूर, औंढा नागनाथ, परळी वैजनाथ, अंबाजोगाई, औदुंबर, गाणगापूर, अक्कलकोट, नरसोबाची वाडी, तख्त सचखंड श्री हुजूर साहिब (नांदेड) यासारखी १८ हून अधिक तीर्थस्थळे या महामार्गाने जोडली जातील. धार्मिक आणि निसर्गरम्य पर्यटनस्थळे जोडल्यामुळे पर्यटनाला चालना मिळेल.

**जागतिक स्तरावर नावलौकिक**

या महामार्गामुळे प्रवासाचा सरासरी वेळ १८-२० तासांवरून फक्त ७-८ तासांपर्यंत कमी होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील लोकांसाठी हा लाभदायक ठरणार आहे. या प्रदेशात रोजगाराच्या संधी वाढतील आणि काही काळापासून अडचणीत असलेल्या भागात अत्यंत आवश्यक सामाजिक-आर्थिक विकास होईल, विदर्भ राजकन्या श्री रुख्मिणी मातेचे माहेरघर असलेले श्री क्षेत्र कौंडण्यपूरचा या महामार्गात समावेश होणे म्हणजे गौरवाची बाब आहे, यामुळे कौंडण्यपूर नगरीला जागतिक स्तरावर नावलौकिक मिळेल तसेच कौंडण्यपूर नगरीचा झपाट्याने विकास होईल व स्थानिकांना मोठा रोजगार मिळेल, अशी अपेक्षा असल्याचे मत रविराज देशमुख यांनी व्यक्त केले आहे.

# निवडणूक रणनितीसाठी दिल्लीत मोठी हालचाल

## रविंद्र चव्हाण यांची अमित शहांसोबत मध्यरात्री बैठक; फडणवीस-शिंदे चर्चेचा आढावा दिला



विदर्भ प्रजासत्ताक
दि.११मुंबई

आगामी निवडणुकांची चाहूल लागत असताना महाराष्ट्राच्या राजकारणात महत्त्वाची घडामोड घडली आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी दिल्लीमध्ये मध्यरात्री उशिरापर्यंत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत सविस्तर बैठक घेतली. या भेटीला विशेष महत्त्व मानले जात आहे, कारण निवडणुका जवळ आल्याने संघटनात्मक बदल, प्रचारयोजना आणि युतीच्या रणनीतीबाबत भाजप उच्चस्तरीय नेते जलद हालचाली करत आहेत.

या बैठकीत राज्यातील राजकीय वातावरण, जिल्हानिहाय समीकरणे आणि सध्याच्या घडामोडींचा सखोल आढावा घेण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. काही दिवसांपासून राज्यात येणाऱ्या निवडणुकांच्या आधी भाजप-शिंदे गटाच्या समन्वयाबद्दल विविध चर्चा सुरू आहेत. त्यातच ही दिल्लीतील बैठक विशेष ठरली आहे. रविंद्र चव्हाण यांनी शहांसमोर राज्यातील संघटनात्मक स्थिती आणि आगामी काळातील मोहिमेची आखणी यावर विस्तृत माहिती मांडल्याचे सांगितले जात आहे.

विशेष म्हणजे याच दिवशी सकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामध्ये राज्यातील निवडणुकांबाबत महत्त्वपूर्ण चर्चा झाली होती. या चर्चेचा तपशील आणि त्यातून तयार झालेली प्राथमिक रणनीती चव्हाण यांनी शहांकडे सुपूर्द केल्याची शक्यता सूत्रांनी व्यक्त केली आहे. फडणवीस-शिंदे बैठकीत जागावाटप, प्रचार मोहीम, संघटनाची तयारी आणि स्थानिक पातळीवरील मतभेद सोडवण्याबाबत चर्चा झाली होती. ही माहिती शहांपर्यंत पोहोचवणे, ही चव्हाण यांच्या भेटीची एक प्रमुख कारणीभूत बाब असल्याचे मानले जात आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार महाराष्ट्रातील काही महत्त्वाच्या जिल्ह्यांमध्ये पक्षाला मजबूत करण्यासाठी विशेष मोहिमा राबवण्याचा विचार भाजप करत आहे. याबाबत शहांनी चव्हाण यांना काही दिशा दिल्याची शक्यता वर्तवली जात आहे. राज्यातील सत्तास्थिती, तिन्ही पक्षांची ताकद, विरोधकांची आगामी रणनीती आणि जनतेचा कल यांचे विश्लेषण देखील बैठकीत चर्चिला गेल्याचे कळते.

**भाजपचा निवडणूक रोडमॅप आता जवळपास अंतिम टप्प्यात**

रात्रीच्या वेळी झालेली ही बैठक राजकीय वर्तुळात मोठ्या चर्चेचा विषय ठरली आहे. महाराष्ट्रातील भाजप कार्यकर्त्यांमध्येही या घडामोडींनंतर नव्या उमेदीनं चर्चा सुरू झाल्या आहेत. भाजपचा निवडणूक रोडमॅप आता जवळपास अंतिम टप्प्यात आला असून, केंद्रीय नेतृत्वाकडून महत्वाच्या सूचना राज्याला लवकरच दिल्या जाण्याची चिन्हे दिसत आहेत. दरम्यान, भाजप-शिंदे गट आणि फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील समन्वय वाढावा यासाठी शहा स्तरावरून विशेष मार्गदर्शन होण्याची शक्यता राजकीय तज्ञांनी व्यक्त केली आहे. राज्यातील सध्याची राजकीय परिस्थिती आणि आगामी निवडणुका लक्षात घेता, दिल्लीतील ही बैठक दोन्ही पक्षांच्या भविष्यातील हालचालींना दिशा देणारी मानली जात आहे.

# सदस्य आहेत तर मंत्री नाहीत अन् मंत्री आहेत तर लेखी उत्तरच मिळत नाही

## शेतकऱ्यांच्या मदतीसाठी उदासीनता दोन लक्षवेधी पुढे ढकलाव्या लागल्या



विदर्भ प्रजासत्ताक
दि.११नागपूर

विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी, बुधवारी विचित्र परिस्थिती पाहायला मिळाली. लक्षवेधी सूचनांवर चर्चा करण्यासाठी सकाळी १० वाजता विशेष बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीदरम्यान ६ लक्षवेधी सूचनांवर चर्चा होणार होती. मात्र, राज्यात झालेल्या अतिवृष्टीशी संबंधित प्रस्तावावर चर्चा सुरू होणार तेव्हाच अडचण निर्माण झाली. सरकारकडून उत्तर न आल्यामुळे या महत्त्वाच्या विषयावर चर्चा पुढे जाऊ शकली नाही. दुसऱ्या एका लक्षवेधी सूचनेच्यावेळी संबंधित मंत्री उपस्थित नव्हते. त्यामुळे दोन लक्षवेधी सूचना पुढे ढकलाव्या लागल्या.

उद्धव गटाचे आमदार भास्कर जाधव यांची अतिवृष्टीवर आधारित लक्षवेधी सूचना होती. त्यांची लक्षवेधी सूचना पुकारण्यात आली. ती वितरित करण्यात आली आहे, परंतु सरकारतर्फे प्रस्तावावर दिलेले लेखी उत्तर सदस्यांना दिलेले नाही. ही बाब भास्कर जाधव यांनी सभागृहाच्या लक्षात आणून दिली. भास्कर जाधव यांनी म्हटले की, सदस्यांकडे सरकारचे लेखी उत्तरच नसताना ते पूरक प्रश्न कोणत्या आधारावर विचारणार? मंत्री मकरंद पाटील म्हणाले की त्यांच्या जवळ उत्तर उपलब्ध आ. भास्कर जाधव कोणतेही प्रश्न विचारतील तर ते त्याची उत्तरे देण्यास तयार आहेत. मात्र, जाधव यांनी स्पष्ट केले की सभागृहाचे कामकाज नियमांनुसार पार पाडले पाहिजे.उद्योगमंत्री उदय सामंत यांनीसुद्धा भास्कर जाधव यांच्या मुद्याचे समर्थन केले. दुपारी १२-१२ वाजेपर्यंत लेखी उत्तर येत नाही, हे बरोबर नाही. सदस्य उपप्रश्न कसे विचारतील? पीठासीन अध्यक्ष समीर कुनावार यांनी ही बाब गंभीर असल्याचे सांगत, संबंधित माहिती घेऊन सभागृहाला कळविण्यात येईल, असे सांगितले. लेखी उत्तरांच्या वितरणात झालेल्या निष्काळजीपणामुळे ही लक्षवेधी सूचना आज गुरुवारी (दि. ११) घेण्यात येणार आहे.

# वर्षभरात आठ हजार नवीन एसटी बसेस रस्त्यावर येणार

## २०२९ पर्यंत बस डेपोंचा कायापालट करणार



विदर्भ प्रजासत्ताक
दि. ११नागपूर

राज्यातील परिवहन व्यवस्था आणखी सक्षम करण्यासाठी वर्षभरात ८ हजार नवीन एसटी बसेस घेण्यात येणार आहेत. तीन हजार बसेसची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून या वर्षात उर्वरित बसेसची प्रक्रियादेखील पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासाला भाई जगताप, बंटी पाटील यांनी राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कामगारांची प्रलंबित देयके अदा करण्याबाबत तारांकित प्रश्न मांडला होता. त्याच्या उत्तरादरम्यान सरनाईक यांनी ही माहिती दिली.

एसटी सेवा ही कुठल्याही प्रकारच्या फायद्यासाठी चालविली जात नाही. शासनाच्या विविध योजनांमुळे उलट महामंडळाला नुकसानच सहन करावे लागते. मात्र, जनतेचे हित जास्त महत्त्वाचे आहे. २०४७ पर्यंत डिझेलवरील सर्व बसेसची जागा इलेक्ट्रिक बसेस घेतील. तसेच दोन महिन्यांत राज्यातील २१६ एसटी डेपोच्या विकासाची प्रक्रिया सुरू होईल. पीपीपी मॉडेलअंतर्गत हा विकास होईल. २०२९ पर्यंत राज्यातील सर्व एसटी डेपोंचा कायापालट करण्यात येईल, असे सरनाईक यांनी स्पष्ट केले.

महामंडळात कर्मचाऱ्यांचा तुटवडा आहे व कामगारांना डबल शिफ्टदेखील करावी लागते. मात्र, तात्पुरत्या पद्धतीवर अडीच हजार चालक घेण्यात येतील व लवकरच कायमस्वरूपी भरती प्रक्रिया राबविण्यात येईल. पुरवणी मागण्यांमध्येदेखील महामंडळाला २ हजार ८९३ कोटी रुपये मिळणार आहे.

# निवडणुकीत व्हीव्हीपॅट वापरण्याच्या याचिकेवर मुंबईत पुन्हा सुनावणी होणार, आधी नागपूर खंडपीठात




विदर्भ प्रजासत्ताक
दि.११नागपूर

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये 'व्हीव्हीपॅट' यंत्राचा उपयोग केला जावा, याकरिता काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव प्रफुल्ल गुडधे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल केलेली याचिका मंगळवारी मुंबई मुख्यालयात स्थानांतरित करण्यात आली. यापूर्वी याच याचिकेवर नागपूर खंडपीठात सुनावणी पूर्ण झाली होती आणि न्यायालयाने निर्णय राखीव ठेवला होता. मात्र आता यावर पुन्हा सुनावणी घेतली जाणार आहे.

यावर्षी जाहीर झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांशी संबंधित सर्व याचिका मुंबई मुख्यालयात स्थानांतरित करण्याचे निर्देश मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांनी ५ डिसेंबर रोजी दिले आहेत. त्यामुळे ही याचिका मुंबई मुख्यालयात स्थानांतरित करण्यात आली आहे. या याचिकेवर नागपूर खंडपीठातील न्या. अनिल किलोर व रजनीश व्यास यांच्यासमक्ष गेल्या २१ नोव्हेंबर रोजी अंतिम सुनावणी झाली होती. त्यानंतर याचिकेवरील निर्णय राखून ठेवण्यात आला होता. आता या याचिकेवर मुंबई मुख्यालयात नव्याने सुनावणी घेतली जाईल.

सर्वोच्च न्यायालयाने विविध प्रकरणांमध्ये दिलेल्या निर्णयानुसार निवडणुकांमध्ये 'व्हीव्हीपॅट'चा उपयोग करणे बंधनकारक आहे. 'व्हीव्हीपॅट' पारदर्शी निवडणूक प्रक्रियेचे अत्यावश्यक अंग आहे. असे असतानाही राज्य निवडणूक आयोग स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये 'व्हीव्हीपॅट'चा उपयोग करीत नाही. 'व्हीव्हीपॅट'शिवाय निवडणुका घेतल्यास मतांची चोरी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे निवडणुकीच्या उद्देशाची पायमल्ली होईल. संवैधानिक मूल्ये मातीमोल ठरतील, असे गुडधे यांनी याचिकेत म्हटले आहे.

# प्राथमिक शिक्षकांना टीईटी अनिवार्यता प्रकरणी पुनर्विचार करा

## खासदार बळवंत वानखडे,खा.डॉ.शिवाजीराव काळगे,खा.अमर काळे, खा.डॉ.कल्यान काळे यांची केंद्रीय शिक्षण मंत्र्याकडे मागणी



विदर्भ प्रजासत्ताक
दि.११अमरावती

राज्यातील शिक्षकांवरील टीईटी अनिवार्यता सक्तीबाबत पुनर्विचार करण्याची मागणी अमरावती लोकसभा मतदार संघाचे खासदार बळवंत वानखडे,लातूर लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ.शिवाजीराव काळगे,वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमर काळे,डॉ.कल्यान काळे यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याकडे केली आहे. उच्च न्यायालयाने १ सप्टेंबर २०२५ रोजी दिलेल्या निर्णयानुसार सेवेत पाच वर्षांपेक्षा जास्त कालावधी शिल्लक असलेल्या सर्व शिक्षकांना १ सप्टेंबर २०२७ पर्यंत टीईटी उत्तीर्ण करणे सक्तीचे ठरविले आहे. अपयश आल्यास सेवा समाप्त करण्याचा आदेश असल्याने राज्यातील लाखो शिक्षकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.संघटनांचे म्हणणे आहे की २०१३ पूर्वी नियुक्त शिक्षकांनी त्या काळातील प्रचलित शैक्षणिक पात्रतेनुसार सेवा स्वीकारली असून आता टीईटीची सक्ती लादणे हा स्पष्ट अन्याय आहे. या निर्णयामुळे शिक्षकांमध्ये मानसिक, सामाजिक आणि आर्थिक तणाव वाढला असून कुटुंबांसह विद्यार्थ्यांवरही त्याचा परिणाम होत आहे.

या परिस्थितीची दखल घेत शिक्षक समिती प्रतिनिधींनी खा. बळवंत वानखडे,डॉ.शिवाजीराव कालके, खासदार अमर काळे,खा.डॉ.कल्यान काळे यांना निवेदन दिले. त्यानंतर खासदार वानखडे,काळे,काळगे,काळेयांनी संसद सत्रादरम्यान शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना लेखी निवेदन देऊन आरटीईच्या कलम २३(२) मध्ये सुधारणा करावी, तसेच २०१३ पूर्वी नियुक्त शिक्षकांना टीईटीमधून सूट द्यावी, अशी मागणी केली. शिक्षणमंत्री प्रधान यांनी या प्रकरणी योग्य ती कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन दिले.

खा.डॉ शिवाजीराव काळगे (लातूर ), खा.अमर काळे (वर्धा) व खा.बळवंत वानखडे (अमरावती) खा.डॉ.कल्यान काळे(जालना) या खासदार महोदयांनी शिक्षक टीईटी बाबतचे पत्र माननीय धर्मेंद्र प्रधान शिक्षणमंत्री महोदय,भारत सरकार दिले आहे.शिक्षक समितीने केलेल्या मागणीचा विचार करावा असे सदर पत्रात नमुद आहे.शिक्षक समितीचे राज्य नेते उदयजी शिंदे,राज्याध्यक्ष मा.विजयजी कोंबे व राज्य सरचिटणीस मा.राजन जी कोरगावकर यांच्या सूचनेनुसार समितीचे वसंत घोगरे यांनी या संदर्भात खासदार डॉ.शिवाजीराव काळगे,आल्हाद तराळ यांनी बळवंत वानखडे,अमर काळे यांना विजय कोंबे, डॉ.कल्यान काळे यांनी लेखी निवेदन दिले होते.तसेच राज्यातील सर्व खासदार लोकसभा व राज्यसभा सदस्य यांना निवेदन दिले होते.असे प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

# तिवसा येथे महामार्गावर अपघात टाळण्यासाठी तात्काळ उपाययोजना करा

## भाजपा महिला आघाडी तिवसाचे पोलिस स्टेशन येथे निवेदन



विदर्भ प्रजासत्ताक
दि.११तिवसा

तिवसा शहर नॅशनल हायवे वर आहे शहरात चार पाच ठिकाणी रस्ता दुभाजक असून या ठिकाण वरून नागरिक रस्ता ओलांडतात शिवाय रस्त्यालगत शाळा महाविद्यालय आहे शाळा सुरू होताना आणि सुट्टी झाल्यावर विद्यार्थ्यांची गर्दी होते रस्ता ओलांडताना रस्ता दुभाजकावर नेहमी अपघात होतात त्यामुळे या ठिकाणी किमान शाळेच्या वेळेत ठीक ठिकाणी वाहतूक नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिस बंदोबस्त नियमित ठेवण्यात यावा जेणे करून अपघात टाळण्यासाठी मदत होईल शालेय विद्यार्थ्यांना नुकसान होणार नाही त्याच सोबत सुरक्षेच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्वाचे असून यावर त्वरित कारवाई करण्यात यावी त्याच प्रमाणे शहरात आवश्यक त्या ठिकाणी स्पीड ब्रेकर करण्या साठी पोलिस प्रशासनाने सुद्धा प्रयत्न करावे अशा अनुषंघांचे निवेदन तिवसा तुलुका महिला आघाडी ग्रामीण व तिवसा शहर यांचे वतीने देण्यात आले.

यावेळी तिवसा तालुका महिला अध्यक्ष सौ मयुरी सचिन राऊत विजया ताई वानखडे मनीषा ताई तवर सरचिटणीस निलिमा ताई समरीत तिवसा शहर अध्यक्ष सौ वंदना ताई गोंडसे माधुरी गंधे शैला ताई गोंडसे पंचफुला धोटे योगिता गोंडसे शांताबाई साबळे संगीता बेलसरे उपस्थीत होत्या. त्यावेळी सचिनभाऊ राऊत वैभव भोंबे अजय केने यांनी सुद्धा सविस्तर चर्चा करून यावर सकारात्मक पावले उचलावी असे सांगितले .

# डिसेंबर आला, आता बहिरम यात्रेची प्रतिक्षा

## मंदिर संस्थान, प्रशासन, पोलीस विभाग व्यापारी वर्ग, व्यवस्थापनेसाठी सज्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ११ चांदूरबाजार**

सातपुड्याच्या पवित्र पर्वतरांगेत वसलेले श्री बहिरम बाबा देवस्थान... श्रद्धेचे शक्तिपीठ, संकट-मोचनाचे आश्रयस्थान. दरवर्षी मार्गशीर्ष महिन्यात पारंपरिक रितीने पार पडणारी ही यात्रा यंदाही भाविकांच्या उत्साहाने उजळून निघणार आहे. २० डिसेंबरपासून प्रारंभ होणाऱ्या या वार्षिक सोहळ्याची तयारी आता परमोच्च टप्प्यात पोहोचली असून परिसरात भक्तिभावाचा दिव्य सुगंध दरवळू लागला आहे.

संपूर्ण राज्यासह सीमेपलीकडील प्रदे-शातूनही भाविकांचे लोंढे सातपु-ड्याकडे मार्गस्थ होतात. पर्वतशिखरावर दिमाखात प्रतिष्ठित असलेल्या अकराळ-विक्राळ स्वरूपातील मूर्तीचे दर्शन घेताच भक्तांच्या हृदयात श्रद्धेचा प्रवाह धावू लागतो. बहिरम बाबांच्या चरणी मुरमुरे-रेवढ्या, पेढे, रोडगे यांसारखे प्रसाद अर्पित करून भक्तांकडून कृतज्ञतेचा नांदीसुर उमटतो.

यात्रेदरम्यान व्यापारासाठी येणाऱ्या व्यावसायिकांसाठी जागावाटपास ८ ते १६ डिसेंबरदरम्यान अर्ज पद्धतीने करण्यात येणार आहे. या यात्रेमुळे अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाला आधार मिळतो तसेच स्थानिक बाजारव्यवस्थेलाही मोठी चालना मिळते. विशेष म्हणजे शेतकरी वर्गासाठी लागणाऱ्या साहित्याचा मोठा व्यवहार येथे पार पडतो. भक्तांच्या सोयीसाठी दर्शनव्यवस्था, पिण्याचे पाणी, वाहतूक नियंत्रण, स्वच्छता, वैद्यकीय सेवा आणि सुरक्षा यांसाठी देवस्थान समिती व प्रशासन नियोजनबद्ध अंमलबजावणी करत आहे. भाविकांना अन्नसेवेचा लाभ देणारे मोफत धान्यछत्र यावर्षीदेखील सुरू राहणार आहे. यात्रेचे आणखी एक आकर्षण म्हणजे भजन, कीर्तन, भारूड आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे भक्तिभाव जागवणारे सादरीकरण. विविध संस्थांतर्फे आरोग्य स्वच्छतेविषयक जनजागृती उपक्रम राबवले जाणार आहेत. सातपुड्याची हिरवाई, डोंगराळ वाऱ्याचा स्पर्श आणि जयघोषाचा नाद या सर्वांनी देवस्थान परिसरात निसर्ग आणि अध्यात्म यांचा लोभस मिलाफ साधला जातो. आदिवासी बांधवांच्या विशेष श्रद्धेमुळे त्यांचा सहभागही उल्लेखनीय असतो. थंडीच्या मोसमात भरविण्यात येणाऱ्या या यात्रेतील हंडीमधील मटन हे आगळे-वेगळे आकर्षण भाविकांच्या जेवणात चव आणि ऊब दोन्ही वाढवते.





जिल्हा परिषदेच्या अधिपत्याखाली पार पडणाऱ्या या यात्रेच्या व्यवस्थापनाची जबाबदारी चांदूरबाजार पंचायत समितीकडे असून विविध विभागांचे अधिकारी या यात्रेच्या यशस्वीतेसाठी कार्यरत आहेत. यात्रेदरम्यान शांतता आणि शिस्त राखण्याची धुरा शिरजगाव कसबा पोलिस ठाण्याकडे आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही भक्तिभावाची प्रचंड लाट बहिरम बाबांच्या चरणी ओसंडून वाहणार आहे.चांदूरबाजार तालुक्यासह वैदर्भीय पुन्हा एकदा दैवी चैतन्य व आध्यात्मिक आनंदाने नटून सजणार्या यात्रेसाठी सज्ज झाला आहे. भक्तिरस, निसर्गसौंदर्य आणि श्रद्धेचा अखंड संगम अनुभवण्यासाठी भाविकांची आतुरता दिवसेंदिवस वाढत आहे.

**नवसाला पावणारा भैरवनाथ**

बहिरम बाबा यात्रा ही ब्रिटिश काळापासून सुरू असलेली यात्रा आहे, यावेळी शेतकरी वर्गाकडे मनोरंजनासाठी कोणतेही साधने उपलब्ध नसल्याने, बहिरम मंदिराच्या ठिकाणी डिसेंबर जानेवारी या महिन्यात विदर्भातून मोठ्या प्रमाणात शेतकरी वर्ग येत असे. तर या सर्व येणाऱ्या भाविक भक्तांसाठी शेतकरी वर्गासाठी व्यवस्था म्हणून पाण्याची दोन तलावे, मनकरना मोठी मंनकरणा लहान, असे उपलब्ध करून दिले होते, या तलावामध्ये मोठ्या संख्येने येणारे भाविक गण आपली मातीची भांडी, पितळीचे भांडी उपस्थिताच्या स्वयंपा कासाठी वापरत असत. तर तीच भांडी इतरांना वापरता यावी याकरिता दोरीच्या साह्याने मनकरणा तलावामध्ये पुन्हा स्वच्छ धुऊन ठेवल्या जात असे. याचा फायदा येणाऱ्या भाविक भक्तांना होत होता, मात्र कालांतराने काही अभद्र लोकांनी ही भांडीच त्या परिसरातून लांबविली. मात्र आता भाविक गण आपली स्वतःचीच भांडी घेऊन येथे वेगवेगळ्या पद्धतीने स्वयंपाक करून भैरव बाबाला प्रसन्न करण्याचा मार्ग अवलंबित असतात.. आणि त्याच स्वरूपात भैरम बाबांना आपला नवस मागत असतात.. तर नवसाला पावणारा बहिरम बाबा प्रत्येकाचं दुखणं जाणतो आणि र्वांचे दुःख दूर करतो अशी आख्यायिका या तिकाणी आहे.

**यात्रेत भाविकांच्या सुविधेचा अभाव**

बहिरम तीर्थक्षेत्र परिसरामध्ये लाखोच्या घरात भाविक गड येत असल्याने, महिला पुरुष अबालवृद्ध यांना त्याचबरोबर जवळपास दोन महिने याच ठिकाणी वास्तव्य करणा-या व्यावसायीकांना स्वच्छतागृहांची व्यवस्थित सोय नसल्याने अनेक व्यावसायिक तसेच नागरिक भाविक गण उघड्यावरच शौच करतात, प्रशासनाच्या वतीने दोन शौचालय जरी उभारले असले तरी त्यामध्ये मुबलक पाण्याची व्यवस्था नसल्याने अनेकांची गैरसोय होते.पिण्याच्या पाण्याच्या टाकी परीसरात घाणीचे साम्राज्य असते.तर व्यावसायिक प्रतिष्ठाने खाद्याचे स्टॉल, भोजनालय हॉटेल, यांच्यासाठी मुबलक पाणी व्यवस्था नसल्याने त्यांना प्रति बैरल (ड्रम) पाणी विकत घ्यावे लागते.

**हंडीच्या मटनाचे आकर्षण**

बहिरम यात्रेला प्रारंभ होताच या परिसरामध्ये अनेकांकडून राहुटी सुद्धा टाकल्या जाते, सुट्टीचे दिवस घालवण्यासाठी शनिवार रविवार आपापल्या नातेवाईकांसह या रावट्यांमध्ये मटन हंडीची मेजवानी अनेकांना दिली जाते. असे म्हणतात की येथील मटन हंडीची चय इतर कुठल्या ठिकाणी केल्यावर येत नाही, त्यामुळे मोठ्या प्रमाणामध्ये इथे महिला पुरुष आणि माणस आहार करणारे खाण्याचे शौकीन यात्रेदरम्यान प्रवास करत असतात,

**काही वर्षापुर्वी तमाशासाठीच यात्रेची ओळख**

बहिरम यात्रा एकेकाळी तमाशाच्या फळासाठी प्रसिद्ध होती, बहिरम येथील तमाशाच्या रावटी मध्ये संपूर्ण महाराष्ट्र-भरातून लावणी कलावंत आपली लावणी सादर करण्यासाठी येत असत, पुणेकर सोलापूरकर, कोल्हापूरकर, या ठिकाणावरून लावणी कलावंतांचा फळ तमाशाच्या माध्यमातून येथील शेतकरी वर्गाचे करमणूक करत असे. मात्र करमणुकीच्या नावावर फळातील महिला भलत्याच नादी लागल्या, आणि बघता बघता या परिसरातील गावे, बदनाम झालीत, त्याचबरोबर पैशाने सुद्धा कंगाल झाली, तर काही आंबट शौकिनांना भयंकर रोगाची लागण होऊन अनेकांची संसार ही उध्वस्त झाले. या सर्व विषयाची गंभीर दखल घेत तत्कालीन आमदार बच्चू कडू यांनी कडक तमाशे बंद केले.त्यावेळी आजूबाजूच्या परिसरातील सर्व महिला वर्गानी बच्चू कडूंचे धन्यवाद मानले.

**बैलगाडा शर्यतीने यात्रेची शोभा वाढविली**

शेतक-यांचा जिव्हाळ्याचा विषय असणा-या बहिरम यात्रेमध्ये गेल्या पंधरा वर्षापासून बैलगाडा शर्यत आयोजित करण्यात येत असते, या बैलगाडा शर्यतीमध्ये संपूर्ण महाराष्ट्रभरातून तसेच मध्य प्रदेशातील भागातून सुद्धा बैलगाड्या धावण्याच्या शर्यतीसाठी येत असतात, माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी सुरू केलेल्या या प्रतियोगीते नंतर आता, इतर पक्षाच्या पदाधि-काऱ्यांनी सुद्धा या शर्यतीचे आयोजन करणे सुरू केले आहे, त्यासाठी २० तारखेपुर्वीच याचे आयोजनाची तयारी केली जाते.

**यात्रेच्या व्यवस्थापनाला अल्प निधी**

यात्रेतील दुकानासाठीं जागेचा लिलाव केला जातो.यातुन मिळणारे उत्पन्नाचा पन्नास टक्के भाग जिल्हा परीषद व पन्नास टक्के कारंजा ग्राम पंचायतीला दिला जातो.जिल्हा परीषदेला मिळणार्या पन्नास टक्के रकमेतून यात्रेच्या व्यवस्थापनाकरीता निधी दिला जातो.परंतु हा निधी अत्यंत कमी मिळत असल्याने यातच यात्रेतील यात्रेकरुंच्या सोयी सुविधेसाठी दिला जातो.या तोडक्या निधीतूनच पिण्याचे पाणी,लाईट,साफसफाई यासारखी कामे पार पाडावी लागतात.गेल्या वर्षी जागेच्या लिलावातून २४ लाखाचे वर उत्पन्न झाले.यातला पन्नास टक्के उत्पन्न कारंजा ग्राम पंचायत ला गेले.तर उर्वरीत पन्नास टक्के निधीतून पंचायत समीतीला साडे तीन लाखाचे जवळपास निधी मिळाल्याची माहीती आहे.यानिधीतून यात्रेचे व्यवस्थापन केल्या गेले.त्यामुळे यात्रेत विविध सुविधांचा अभाव जाणवला.तशी यात्रेकरु व व्यापार्यांनी ओरड देखील केली.मात्र याची जि.प. व पं.स. प्रशासनाकडुन दखल घेतल्या गेली नाही.यावर्षी तरी यात सुधारणा करावी अशी मागणी होत आहे.

# वाढोणा येथे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व कर्मयोगी गाडगेबाबा पुण्यतिथी महोत्सव थाटात साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ११ धामणगाव रेल्वे**

दरवर्षीप्रमाणे वाढोणा येथे वर्ष ४५ वे वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी महोत्सव वाढोणा गा. गावांमध्ये साजरा करण्यात आला हा कार्यक्रम पाच दिवसीय असुन घटस्थापना तळेगाव दशासर येथील ठाणेदार किरण औटे यांच्या हस्ते झाली व त्यांनी या वेळेस सर्वांना मार्गदर्शन केले त्यानंतर सर्वधर्म सामुदायिक प्रार्थनेच्या महत्त्वावर गुरुदेव प्रचारक विशाल ठाकरे यांनी मार्गदर्शन केले दुसऱ्या दिवशी सकाळी पाच वाजता सामूहिक ध्यान व ध्यानाच्या महत्त्वावर रूपरावजी बुटके यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर रांगोळी स्पर्धा भाषण स्पर्धा घेण्यात आल्या. सकाळी सात वाजता सर्वधर्म सामूहिक ध्यानाच्या महत्त्वावर ग्रामगीता प्रचारक रवी दादा




चौधरी यांनी मार्गदर्शन केले. तिसऱ्या दिवशी सकाळी पाच वाजता सामुदायिक ध्यानाच्या महत्त्वावर डॉक्टर प्रशांत इंगोले यांनी मार्गदर्शन केले त्यानंतर सकाळी आठ वाजता वैराग्यमूर्ती गाडगेबाबा यांची रामधून फेरी गावांमधून काढण्यात आली. दुपारला महिला हळदि कुंकवाचा कार्यक्रम आटोपला सायंकाळी सात वाजता सर्व धर्म सामुदायिक प्रार्थनेच्या महत्त्वावर अनिल जी बगाडे यांनी मार्गदर्शन केले. चौथ्या दिवशी सकाळी पाच वाजता सामुदायिक ध्यान व ध्यानाच्या महत्त्वावर विक्रमजी कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. सायंकाळी सात वाजता सर्व धर्म सामुदायिक प्रार्थनेच्या महत्त्वावर महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या वर प्रमोदजी हातेकर व विलासजी पाटील यांनी मार्गदर्शन केले.पाचव्या दिवशी सकाळी पाचला सामुदायिक ध्यान व ध्यानाच्या महत्त्वावर पोलीस पाटील रूपेश तितरे यांनी मार्गदर्शन केले. नंतर वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पालखीची भव्य शोभायात्रा गावांमधून निघाली नंतर काल्याचे किर्तन ह.भ.प. श्री. निलेश महाराज मोहोकार यांनी केले व त्यानंतर समाजकार्यात व गावातील प्रगतशील शेतकरी गुणवंत विद्यार्थिनी यांचा सत्कार करण्यात आला यामध्ये सत्कारमूर्ती ग्राम स्वच्छता दूत त्र्यंबकराव गुलाबराव गायकवाड, पत्रकार गजानन फिरके प्रशांत नारे, अतुल तितरे, राजेंद्र राऊत, कर्मयोगी फाउंडेशन, आम्ही बालाजी फाउंडेशन, अंकुश गाते, अशोक निखाडे, संदीप राऊत, संजय काळे, रोशन तितरे, गजानन पुनवटकर, विद्यार्थिनी राधिका जुनघरे, धनश्री माळोदे, श्रुती वाळके, श्रावणी गायकवाड, गुंजन चहांदे, यांचा यावेळी शाल व शिल्ड देऊन सत्कार करण्यात आला. व नंतर व लगेच भव्य असे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती भाऊरावजी बगाडे, रवी भाऊ चौधरी, गिरीश भाऊ भुतडा,मारोतराव सातपुते, ठाणेदार किरणजी औटे, अनिलजी बगाडे, स्वातीताई शैलेंद्रजी मेटे, विशाल भाऊ ठाकरे, पत्रकार गजानन फिरके, त्र्यंबकराव गायकवाड, राजीव भाऊ भेंडे, गोपाल भाऊ भापकर, यांची कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती होती, नंतर जवाहर सुतगिरणीचे संचालक पंकज भाऊ गायकवाड गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष राजुभाऊ ठोंबरे, राजूभाऊ तितरे, विजय पाटील, सुरज तितरे ,पवन राठी, विवेक गुडधे,किरण गुडधे ,विलास हरणे, सुनील नेरकर, अतुल तितरे ,सचिन भोयर,या सर्व गुरुदेव भक्तांनी कार्यक्रम यशस्वी केला नंतर राष्ट्रवादींना घेऊन गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष राजीव ठोंबरे यांच्या वतीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली यामध्ये गावातील नागरिक व तरुण- तरुणींनी मोठ्या प्रमाणात सहभाग दर्शवला होता.

# अखेर नांदगाव खंडेश्वर तहसील कार्यालयाला मिळाले दोन नायब तहसीलदार

## एक नायब तहसीलदार यांचेसह अनेक पदे अद्यापही रिक्त संजय गांधी निराधार योजनेचे लाभार्थी अजूनही प्रतीक्षेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ११ नांदगाव खंडेश्वर**

गेल्या अनेक वर्षांपासून नांदगाव खंडेश्वर तहसील कार्यालयात नायब तहसीलदारांसह अनेक महत्त्वाची पदे रिक्त असल्यामुळे तालुक्यातील सामान्य नागरिकांची कामे मोठ्या प्रमाणात रखडलेली होती.विविध विभागांचे अतिरिक्त काम करताना येथील कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामाचा मोठा ताण वाढत असल्याची बातमी वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाल्यानंतर अखेर शासनाने याची गंभीर दखल घेतली. आणि येथील तहसील कार्यालयात दोन नायब तहसीलदारांची नियुक्ती तातडीने करण्यात आली असून काही अन्य रिक्त पदांनाही तातडीने मंजुरी देण्यात आली आहे.

नियुक्त करण्यात आलेल्यांमध्ये सुनील सुधाकर राठोड यांची निवासी नायब तहसीलदार म्हणून तर सदानंद देशपांडे यांची महसूल नायब तहसीलदार म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. या दोन्ही नियुक्त्यांमुळे महसूल,प्रमाणपत्रे, फेरफार,नोंदणी,तक्रार निवारण आदी महत्त्वाच्या कामांना गती येण्याची अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.





**संजय गांधी निराधार योजनेचे महत्त्वाचे पद अजूनही रिक्त**

दरम्यान वृद्ध, दिव्यांग,निराधार महिलांसाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरणाऱ्या संजय गांधी निराधार योजनेच्या नायब तहसीलदार पदावर मात्र अद्याप नियुक्ती झालेली नाही.यामुळे पेन्शनसाठी अर्ज करणाऱ्या वृद्धांना महिनो नमहिने तहसील कार्यालयाची पायपीट करावी लागत असून त्यांना सातत्याने अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तालुक्यातील वयोवृद्ध नागरिकांसाठी ही मोठी समस्या ठरत असून शासनाने तातडीने लक्ष देऊन हे रिक्त असलेले पद भरण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

**ही पदे आहेत रिक्त**

तहसील कार्यालयात खालील महत्त्वाची पदे अद्याप रिक्त असून यामुळे अनेक विभागांचे काम संथ गतीने सुरू आहे.संजय गांधी निराधार योजना – नायब तहसीलदार : १ पद

ज्युनियर क्लर्क : १ पद, शिपाई : १ पद, मंडळ अधिकारी (पापड-मंडळ) : १ पद आणि तलाठी : ४ पदे त्यामध्ये धामक – बेलोरा,येवती,मंगरूळ चव्हाळा आणि सातरगाव या पदांच्या रिक्ततेमुळे संबंधित गावांतील नागरिकांना सातत्याने अडचणींचा सामना करावा लागत आहे.

**पालकमंत्र्यांनी घ्यावी तातडीने दखल; नागरिकांची मागणी**

नांदगाव खंडेश्वर तालुका वासियानी जिल्ह्याचे पालकमंत्री यांचे लक्ष या रिक्त पदांकडे वेधले आहे. दोन नायब तहसीलदारांच्या नियुक्त्या स्वागतार्ह असल्या तरी उर्वरित पदे भरल्याशिवाय नागरिकांच्या समस्या पूर्णपणे सुटणार नाहीत अशा प्रतिक्रिया तालुक्यातून उमटत आहेत. त्यामुळे या महत्वपूर्ण समस्येकडे शासनाने लक्ष देण्याची गरज असल्याचे नागरिकांनी म्हटले आहे.

# साई नगर प्रभागातील विकासकामांना मोठी गती : भाजपा नेते तुषार भारतीय यांच्या प्रयत्नांना यश, ३५ कोटी रुपयांची मंजुरी

**विदर्भ प्रजासत्ताक दि. ११ अमरावती**

साई नगर प्रभाग (क्र. १९) आणि तपोवन परिसरातील दीर्घकाळ रखडलेल्या विकासकामांना गती देण्यासाठी भाजपा नेते तुषार भारतीय यांच्या पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. ३५ कोटी रुपयांच्या विकास निधीची मंजुरी मिळाल्याने नागरिकांचा दिलासा झाला आहे. गेल्या १५ दिवसांत बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुमारे ५० पेक्षा अधिक चोरीच्या घटना घडल्याने साई नगर व तपोवन परिसरात स्वतंत्र अद्ययावत पोलीस स्टेशनची तातडीची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले. या संदर्भात तुषार भारतीय यांनी मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन प्रस्तावाला मंजुरी देण्याची मागणी केली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्वरीत निर्णय घेऊन नागरिकांना दिलासा देऊ अशी ग्वाही दिली.



क्रीडा संकुलासाठी म्हाडाची ७ एकर जागा हस्तांतरित बाबत तुषार भारतीय यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे म्हाडाची ७ एकर जागा मनपाकडे क्रीडा उपक्रमांसाठी हस्तांतरित करण्यात आली आहे. या जागेवर अत्याधुनिक क्रीडा संकुल उभारण्यात येणार असून त्यात स्विमिंग टँक, जिमनॅस्टिक हॉल, बॅडमिंटन व टेबल टेनिस हॉल, स्काश कोर्ट, योग केंद्र, क्रिकेट मैदान, जॉगिंग पार्क, या सर्व सुविधा उपलब्ध होणार आहेत. या संदर्भात तुषार भारतीय यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्रावर क्रीडा सचिवांना तातडीने कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत.

पावसामुळे अत्यंत खराब झालेल्या साई नगर प्रभागातील रस्त्यांचे काँक्रिटीकरण व पेव्हिंग ब्लॉक बसविण्यासाठी तुषार भारतीय यांनी सादर केलेल्या प्रस्तावाला मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत नगरविकास विभागाला तातडीने कारवाईचे आदेश दिले. प्रभागातील रस्ता विकास प्रस्ताव (एकूण अंदाजित खर्च : ५ कोटी रुपये) असून यामध्ये महेश नगर – अतुल भारद्वान फ्लॅटपर्यंत, काँक्रिट + पेव्हिंग ब्लॉक – १ कोटी पटेरिया किराणा – विठ्ठल मंदिर, अंबा कॉलनी काँक्रिट + पेव्हिंग ब्लॉक – १.५० कोटी, गणेश विहार नं. २ – व्ही. डी. जोशी घरापर्यंत काँक्रिट + पेव्हिंग ब्लॉक – १ कोटी, राजाभाऊ इंगोले (महाबँक कॉलनी) – पोस्टल कॉलनी, काँक्रिट + पेव्हिंग ब्लॉक १ कोटी, उदय कॉलनी हरिओम कॉलनी – पाण्याची टाकीपर्यंत काँक्रिट + पेव्हिंग ब्लॉक ५० लाख, राधे राधे दूध डेअरी शिवाजीनगर काँक्रिट + पेव्हिंग ब्लॉक १ कोटी व चार वर्षे रखडलेला विकास वेगाने मार्गी लावणे या सर्व निर्णयांमुळे गेल्या चार वर्षांपासून रखडलेली कामे आता गतीने पूर्ण होण्याची शक्यता निर्माण झाली असून नागरिकांनी भाजपा नेते तुषार भारतीय यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# दर्यापूर तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक रणसंग्राम सुरू

## इच्छुक उमेदवार लागले कामाला; चारही सर्कल अनुसूचित जाती करीता राखीव; पुढाऱ्यांची झाली पंचाईत;नवख्या उमेदवारांना मिळणार संधी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ११ दर्यापूर**

दर्यापूर नगर परिषद निवडणूक रणसंग्राम संपन्न झाला आता फक्त २१ डिसेंबर रोजी निकालाची वाट आहे.या निकालाबद्दल खमंग चर्चा रंगत असून यासोबतच आता अमरावती जिल्हा परिषद व दर्यापूर पंचायत समिती निवडणूक रणसंग्राम सुरू झाला आहे. अमरावती जिल्हा परिषद करिता ५९ जागांपैकी दर्यापूर तालुक्यात खल्लार,थिलोरी,येवदा,पिंपळोदअसे चार सर्कल असून हे चारही सर्कल अनुसूचित जाती करीता राखीव झाले आहे.त्यामधील पिंपळोद सर्कल अनुसूचित जाती सर्वसाधारण असून इतर तीन सर्कल महिला राखीव असल्याने



ग्रामीण राजकारणातील बलाढ्य पुढाऱ्यांची मोठी पंचाईत झाली आहे,तर नवख्या उमेदवारांना मोठी संधी उपलब्ध झाली आहे.

तालुक्यातील जिल्हा परिषद खल्लार सर्कल मध्ये अनुसूचित जाती लोकसंख्या ११६५७,थिलोरी १०२४०,येवदा ८७३३,पिंपळोद ९२४७ असून या चारही सर्कल मागील वेळी खुले होते.यामध्ये खल्लार मधील अपक्ष सुनील पाटील डीके,थिलोरी मधील बळवंत वानखडे,येवदा मधून वंदना रत्नाकर करुळे,पिंपळोद मधून बाळासाहेब हिगणीकर आदी दिग्गज नेते प्रतिनिधित्व करत होते.यासोबत काँग्रेस,राष्ट्रवादी, शिवसेना,भाजपा या सर्वच पक्षाच्या नेत्यांना तालुक्यात कोणताच पर्याय उपलब्ध नाही.त्यामुळे त्यांना घरात शांत बसण्याची वेळ आली आहे.

तर अनुसूचित जाती प्रवर्गातील महिला व नेते यांना सुगीचे दिवस आले आहे.त्याचे राजकीय करिअर घडणार असल्याने ते मोठ्या प्रमाणावर मोर्चा बांधणीला लागले आहे. तसेच दर्यापूर पंचायत समिती करीता आठ गण असून त्याकरिता सुद्धा अनेक नवखे उमेदवार यांनी आपली मोर्चा बांधणी सुरू केली आहे.पण या सर्वावर आरक्षण वाढल्याने न्यायालयाची टांगती तलवार असल्याने सर्वच राजकीय नेते यांनी सावध पवित्रा सध्या तरी घेतला आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत